साप्ताहिक

# माणूस

शनिवार
६ मार्च १९८२

किंमत
एक रुपया

## प्राध्यापकांच्या बहिष्काराला विद्यार्थ्यांचा विरोध कशासाठी ?

मुंबई, पुणे व महाराष्ट्रात अन्यत्रही सध्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे 'परीक्षा बचाओ' आंदोलन सुरू आहे. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांतील प्राध्यापकांनी विद्यापीठाच्या परीक्षांच्या कामावर बहिष्कार टाकण्याचे धोरण जाहीर केल्यामुळे राज्यातील लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे. आधी परीक्षा लांबणीवर पडणार, नंतर निकाल उशीरा लागणार, परिणामतः नवे शैक्षणिक वर्षही उशीराच सुरू होणार, या सगळ्या संभाव्य घटनाक्रमामुळे अवघा विद्यार्थीवर्ग अस्वस्थ होणे स्वाभाविक आहे. या अस्वस्थतेतूनच अ. भा. विद्यार्थी परिषदेच्या पुढाकाराने 'परीक्षा बचाओ' आंदोलनाची सुरुवात झाली आहे.

विद्यापीठांच्या परीक्षांवर बहिष्कार घालण्याच्या प्राध्यापकांच्या निर्णयाची चर्चा या 'परीक्षा बचाओ' आंदोलनामुळे अधिकच वाढली आहे. मुंबई–पुण्यातील प्रमुख वृत्तपत्रांनी या विषयावर अग्रलेख लिहिले आहेत. सर्वसामान्यपणे प्राध्यापकांच्या बहुसंख्य मागण्या न्याय्य व उचित आहेत, त्याबाब सरकारने तातडीने निर्णय घेतला पाहिजे हेही खरे आहे; परंतु त्यासाठी परीक्षांवरील बहिष्काराचा मार्ग प्राध्यापकांनी अवलंबू नये, असेच मत वर्तमानपत्रांनी, विचारवंतांनी व सामाजिक–राजकीय नेत्यांनी व्यक्त केले आहे.

प्राध्यापकांच्या मागण्यांना पाठिंबा देत असतानाच त्यांच्या बहिष्काराला मात्र कडाडून विरोध करणाऱ्या विद्यार्थी संघटनांचीही नेमकी हीच भूमिका आहे. विद्यापीठ परीक्षांवरील प्राध्यापकांच्या बहिष्काराला विद्यार्थ्यांचा कडवा विरोध आहे व या विरोधामागे तशीच काही कारणेही आहेत.

विद्यापीठांच्या परीक्षा वेळेवर होण्यासाठी विद्यार्थ्यांशिवाय खुद्द विद्यापीठ–प्रशासन, विद्यापीठ व कॉलेज–कर्मचारी आणि प्राध्यापक या तीन घटकांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. शिक्षणक्षेत्रातील सध्याच्या सार्वत्रिक गोंधळाच्या परिस्थितीत यातील कोणता ना कोणता घटक, (वा कधीकधी वरील तिन्ही घटक) आपल्या मागण्या किंवा आपली धोरणे प्रतिष्ठेची बनवून लाखो विद्यार्थ्यांना अक्षरशः वेठीस धरतो ! विमान-अपहरणाच्या वेळी आपल्या मागण्यांसाठी निष्पाप विमानप्रवाशांच्या जीवनाशी खेळ खेळणारा गुंड जी भूमिका घेतो त्यात व प्राध्यापकांच्या आताच्या भूमिकेत, तत्त्वतः काहीही फरक नाही. प्राध्यपकही आपल्या संघटित शक्तीच्या जोरावर विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आणीत आहेत. परीक्षांवरील बहिष्कारामुळे वेळापत्रक बिघडणार, विद्यार्थी अस्वस्थ राहणार, पदवी–परीक्षांना बसणारे हजारो विद्यार्थी परीक्षेच्या निकालाची अगतिकपणे केवळ 'प्रतीक्षा'च करीत बसणार ! परिणामतः त्यांच्या नोकरीच्या काही संधी हुकणार, स्पर्धा–परीक्षांच्या तारखा चुकणार, हे सारे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. सुरवातीपासून वर्षाचे शैक्षणिक वेळापत्रक बिघडले की पुन्हा ते रुळावर येणे दुरापस्त ! त्यामुळेच गेली अनेक वर्षे, विशेषतः मुंबई विद्यापीठात, पदव्युत्तर वर्षाच्या विद्यार्थ्यांचे वर्ग डिसेंबरपूर्वी सुरू झालेले नाहीत. या सगळ्या परिस्थितीत विद्यार्थ्याला जो प्रचंड मानसिक ताण सोसावा लागतो, तो वेगळाच ! तेव्हा अशा प्रकारे आपला काहीही दोष नसताना विद्यार्थ्याला ओलीस धरण्याचे जे तंत्र प्राध्यापक वापरतात त्याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये सार्वत्रिक संताप आहे. अ. भा. वि. प. च्या 'परीक्षा बचाओ' आंदोलनामुळे हीच भावना सक्रीयपणे व्यक्त झाली आहे. विशेषतः मुंबईतील विद्यार्थ्यांचा हा विरोध अधिक तीव्र आहे. कारण १९७४ च्या रेल्वे संपाच्या वेळेपासून विद्यापीठ परीक्षांचे गाडे जे घसरले आहे, ते आजतागायत पुन्हा रुळावर आलेलेच नाही ! त्यामुळे विद्यार्थी गेली सात वर्षे सतत असह्य मानसिक ताण सहन करीत आले आहेत. त्यातच अन्य कोणत्याही विद्यापीठापेक्षा नोकरदार विद्यार्थ्यांची संख्या मुंबईत अधिक आहे. दिवसभर नोकरी व संध्याकाळी कॉलेज अशा धावपळीत पदवीसंपादनाचा अट्टाहास धरणाऱ्या या विद्यार्थ्यांच्या अशा आकांक्षांवर परीक्षांचे बिघडलेले वेळापत्रक जवळजवळ पाणीच फिरवते ! रजा मिळविणे व वेळापत्रकाच्या बदलण्यानुसार ती पुढे पुढे ढकलणे अशा कित्येक समस्यांना त्यांना अकारण तोंड द्यावे लागते.

(पृष्ठ २२ वर)

## मुक्काम मुंबई

# परिसंवाद : इंग्रजी लिखाणात उमटलेली भारतीय स्त्रीची प्रतिमा

इंग्रजीतून आणि भारतीय भाषांमधून लेखन करणाऱ्या भारतीय लेखिकांच्या साहित्यात उमटणारी स्त्रीची प्रतिमा. अशा विषयावर मुंबईतल्या मॅक्समुल्लर भवनातर्फे नुकताच एक परिसंवाद सादर करण्यात आला. काही विषय चेष्टा–कुचेष्टा यांच्यासाठी राखीव ठेवण्यात आलेले असतात. स्त्रियांचं लेखन, स्त्री-मुक्ती आणि समानता हे विषय यापैकीच एक आहेत. त्यांच्याविषयी समज कमी, गैरसमज मात्र अनंत ! मात्र वर्तमानकाळात हा विषय स्त्रियांना आणि पर्यायाने एकूणच समाजाला अतिशय जिव्हाळ्याचा ठरणारा. बहुतांश स्त्रिया, त्यातही संवेदनाक्षम, बुद्धिमान स्त्रिया आपल्याच जुन्या आणि नव्या प्रतिमांच्या परस्परविरोधानं गोंधळून गेल्या आहेत आणि त्यामुळेच या संक्रमणाच्या काळात स्त्रियांनी केलेलं आत्मपरीक्षण, साहित्याच्या माध्यमातून त्यांनी रेखाटलेलं स्वतःचं चित्र, स्वतःचे प्रश्न, समाजाबद्दल आणि स्वतःबद्दल व्यक्त केलेल्या अपेक्षा यांना साहित्यिक महत्त्व तर आहेच, पण त्याबरोबरच समाजशास्त्रीय महत्त्वही आहे. तशातही इंग्रजीतून केल्या जाणाऱ्या लेखनाला एक निराळं समाजशास्त्रीय परिमाणही आहे. कारण इंग्रजीतून केल्या जाणाऱ्या लेखनाचा, इतर जागतिक पातळीवरच्या वाङ्मयनिर्मितीबरोबर सहजच तुलनात्मक विचार करता येतो.

परिसंवादात सुरवातीला डॉ. स्नायडर या फ्रॅंकफुर्टवासी प्राध्यापकमहोदयांनी आधारभूत पेपर वाचला आणि त्यात भारतीय लेखिकांच्या इंग्रजी लेखनाविषयीची आपली निरीक्षणं नमूद केली. (मद्रासचं विमान पाच तास लेट झालं, म्हणून विमानतळावरून सामानासकट थेट परिसंवादाला येणाऱ्या स्नायडरनी, आपल्या दहा मिनिटांच्या उशिराबद्दल परत परत वाक–वाकून क्षमा मागितली ! ) या आढाव्याची सुरवात त्यांनी सरोजिनी नायडूंपासून केली; पण नंतर आधुनिक काळातल्या मुख्यतः कमला दास, मालथी राव, अनिता देसाई इत्यादी लेखिकांवरच त्यांनी लक्ष केंद्रित केलं. या लेखनामध्ये सुशिक्षित मध्यमवर्गीय जाणिवा आणि व्यथा दिसतात. ते नेहमीच स्त्रीवर केंद्रित झालेलं असतं आणि समाजानं घालून दिलेल्या नैतिक मूल्यांविषयी त्यात सवाल असतो; पण तरीही हे लेखन–मुख्यतः लघुकथा–वास्तव नाकारीत नाहीत किंवा उपदेशात्मकही बनत नाहीत, त्यांच्यात रोख–ठोक आत्मशोध असतो, विद्रोहाची भावना असते; पण वास्तवाचं स्वप्नरंजनात्मक दर्शन नसतं. त्यामुळं त्या 'ओपन एंडेड '–अनेक शक्यता सूचविणाऱ्या असतात.

भारतीय समाजाची आणि संस्कृतीची तोंडओळख असणाऱ्या, पण परदेशी घडणीच्या एका विद्वानानं केलेलं हे विश्लेषण आहे. त्यामध्ये काही उणीवा, अपुरी माहिती आणि प्रामाणिक गैरसमज असणं स्वाभाविक होतं. या सर्वांमुळं परिसंवादाला एक वरवरचं उच्चभ्रू वळण लागण्याचा धोका होता. मॅक्समुल्लर भवनचं परदेशी बनावटीचं स्टाइलदार वातावरण हे अशा उच्चभ्रूपणाला पोषकच ठरलं असतं. पण या धोक्यातून परिसंवादाला बचावलं ते पुष्पा भाव्यांनी. मराठी लेखिकांच्या लेखनाचा आढावा घेणारं त्यांचं भाषण इतकं व्यापक आणि प्रभावी होतं की, जमलेल्या बहुभाषिक आणि बहुदेशिक श्रोतृवर्गालाही ते थेट जाऊन भिडलं. स्त्रियांच्या, भारतीय स्त्रियांच्या प्रत्यक्ष, वास्तव प्रश्नांची अतिशय जळजळीत जाण त्यांच्या या भाषणात सतत पार्श्वभूमीला होती. शारीरिक दुबळेपणानं येणारं दडपण हा तर स्त्रियांचा जागतिक पातळीवरचा प्रश्न आहेच; पण भारतीय समाजानं संस्कृतीच्या विकृतीकरणानं काही प्रश्न खास निर्माण केलेले आहेत. या देशात स्त्रियांचे आणि दलितांचे प्रश्न पुष्कळ प्रमाणात सारखे आहेत; फक्त तशी स्पष्ट जाणीव समाजात नाही एवढंच काय ते. पण दलितांप्रमाणेच परंपरेनं स्त्रिया दुर्लक्षित आहेत, पायदळी तुडवल्या जाणाऱ्या आहेत. विकासाच्या समान संधी त्यांनाही पुरेशा नाहीत. काही अपवाद वगळले, तर स्त्री आणि दलित असे दोन्ही लेखक कादंबरीऐवजी कथा, कविता असा साहित्यप्रकार निवडताना दिसतात. त्याचा अर्थ असा की,


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : चाळिसावा

६ मार्च १९८२

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये.



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

कादंबरीसारखा व्यापक साहित्यप्रकार तडीला नेण्यासाठी जो व्यापक जीवनानुभव हवा, त्याची त्यांच्याकडे वाण आहे. (अर्थात वर्षाला २५ वगैरे रेटने कादंबऱ्या पाडणाऱ्या धंदेवाईक लेखिकाही आहेत; पण त्यांचं लेखन मनावर घेण्याचं काही कारण नाही!) या समाजरचनेनं तो त्यांना नाकारलेला आहे. एक जबाबदार व्यक्ती म्हणून समाजात त्यांना बरोबरीनं स्थान नाही. स्त्रियांचा असा मानसिक कोंडमारा, उपेक्षा हा स्त्रियांचा एक फार मोठा प्रश्न आहे आणि तो पुष्कळ सार्वत्रिक स्वरूपाचाही आहे. इंग्रजी भाषेत होणाऱ्या भारतीय लेखनात याची कुठली जाण कुठे दिसते? मराठी-मधल्या लेखनातही लोकप्रिय लेखिकांच्या कादंबऱ्यांतून मिल अँड बून छापाचे रोमान्स, व्यथा आणि नाजूक-साजूक वादळांच्या कहाण्या असतात. त्यामधली तथाकथित मुक्त आणि मनस्वी, कणखर इत्यादी इत्यादी नायिका अखेर तिच्याहूनही कणखर अशा नायकाला वश होत असते आणि कादंबऱ्या कशा गोड, बेतशीर होत असतात. या समस्या—जर त्या समस्या असल्याच—तर अतिशय अल्पसंख्याकांच्या समस्या आहेत. त्यांच्यात सखोल सामजिक जाण नाही किंवा स्त्री-मनाचं, स्त्री-जीवनाचं भेदक विश्लेषणही नाही. इंग्रजीतल्या लेखनाचीही नेमकी हीच अवस्था आहे. तिथे चित्रित होणाऱ्या स्त्री-पुरुषसंबंधात असा वर-वरचेपणा तर आहेच; शिवाय एक उथळ आणि दिशाभूल करणारा मोकळेपणा, स्त्री-मुक्तीचा आग्रह आहे, की ज्याची मुळं या मातीत बिलकुल रुजलेली नाहीत. या भडक आणि एक्झिबिशनिस्ट लेखनातल्या स्वातंत्र्याच्या जाणिवा अतिरेकी व्यक्तित्व-वादी असतात. त्यामध्ये समाजाचा संपर्कही नसतो आणि समस्याची संवेदनाशील उकल म्हणावे, तर केवळ लाडावलेल्या आळशी मनानं विणलेली भावनिक गुतागुंतीची बांझोटी जाळी असतात. खरं म्हणजे स्त्री-मुक्तीसारख्या मूलगामी चळवळीवर उथळपणाचा ठपका येतो तो या असल्या लेखनानं. असल्या कथातल्या, २५ व्या मजल्यावरच्या आपल्या सुसज्ज फ्लॅटमध्ये रहाणाऱ्या सुसंपन्न 'ती'ला 'सकाळी उठल्यापासून उगीचच उदास वाटत असतं. खरं म्हणजे समोरच्या झोपडपट्टीतल्या एखाद्या नुकत्याच तारुण्यात येणाऱ्या मुली-लाही उदास वाटत असतं. कारण तिचं भविष्य तिला माहीत नसतं. ते घडवण्याची तिची क्षमता आणि परिस्थिती नसते, पण या झोपडपट्टीकडे नायिकेनं एक कंटाळवाणा कटाक्ष टाकण्यापलीकडे, अधिक ती कुठे लेखनात येत नाही.

मुस्लिम स्त्रियांचे तर अगणित प्रश्न आहेत. तसेच दलित स्त्रियांचे. याची जाणीव या स्त्री-लेखिकाना कुठे आहे? या गोष्टींचा कथाविश्वात प्रवेश होत नाही. कारण त्यांचा हस्तीदंती भावविश्वाच्या, विचारविश्वाच्या मनोऱ्यात मुळी प्रवेशच होत नाही.

या भयाण भौतिक प्रश्नांपलीकडे जाऊन जे बौद्धिक प्रश्न स्त्रीच्या वाट्याला येतात तेही कमी तीव्र नसतात. सांस्कृतिक आणि पारंपरिक आदर्शांच्या संदर्भात माझं स्थान काय? ते कितपत आणि नेमके कसे अन्याय-कारक आहे? या परंपराना मी कुठे विरोध करावा आणि कुठे त्यांचा स्वीकार करावा? या प्रश्नांचं सखोल चिंतन गौरी देशपांड्यांसारख्या एखाद्याच लेखिकेनं केलं आहे. बाकीच्या, त्यातही इंग्रजी भाषेतल्या लेखनानं या बाबतीत एक घातुक परंपरा घालून ठेवली आहे. आमच्या इतिहास आणि परं-परांकडे 'कलरफुल, एक्झॉटिक ओरिएंटल पास्ट' या नजरेनं पाश्चिमात्य बघतात. त्यांची भूमिका केवळ बघ्याची असते आणि म्हणूनच त्यांना 'ही वंडरफुल' वाली भूमिका घेता येते. अशाच पाश्चात्य वाचक-वर्गासाठी जे लेखन उच्चमध्यम वर्ग आणि उच्च वर्गातल्या लेखिका करतात, त्यांच्या लेखी भूतकाळ म्हणजे केवळ स्मरणरमणी-यता! त्यांनी रेखाटलेल्या भूतकाळांना मानवी चेहरा नसतो, असतं फक्त एक वलय. खरं म्हणजे भारतीय स्त्रियांना याच गुलामी परंपरांविरुद्ध झगडून आपलं स्वातंत्र्य मिळ-वावं लागलं आहे, या पार्श्वभूमीवर हा भाबडेपणा भयानक म्हणायला हवा. भूत-काळाचं असं अवास्तव स्तोम माजवणं म्हणजे आजवरच्या साऱ्या वैचारिक प्रगतीकडे संपूर्ण पाठ फिरवणं आहे आणि भारतीय इंग्रजी लेखनाकडून नेमकी हीच घोडचूक घडते आहे.

पुष्पाबाईंचा हा हल्ला एकदम दणदणीत होता आणि त्यांची समीक्षाही नेमकी आणि जवळपास संपूर्णच होती. त्यांनी जे महत्त्वाचे मुद्दे मांडले, त्याला नंतरच्या वक्त्यांनी पुष्टीच दिली. मात्र प्राध्यापिका मणी कामेर-कर म्हणाल्या की, स्त्रिया जरी अतिरेकी व्यक्तित्ववादी विचारसरणी मांडत असल्या तरी चालेल. कारण आतापर्यंत त्याचं एवढं सामाजिकीकरण झालं आहे की, त्याची प्रतिक्रिया म्हणून सुरवातीला असा भडका उडणं स्वाभाविक आहे. संचालिका कुमुद मेहतांनी, इंग्रजी लेखन पाश्चात्य वाचकां-


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य बहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

साठी केलेलं असतं, यावर जोर देऊन म्हटलं की, एकादशी म्हणजे काय वगैरे स्पष्ट करण्यातच असल्या निम्म्या कथा संपतात! डॉ. मीरा देसाईंनी गुजराती लेखनाची परिस्थितीही मराठी लेखनासारखीच आहे, हे स्पष्ट केलं.

सुरवातीला इंग्रजी लेखनाची तळी उचलून धरणारे डॉ. श्नायडर या साऱ्यानं अक्षरश: गार झाले! या सन्माननीय वक्त्या म्हणतात तशी समाजपरिस्थिती असेल, तर लौकिकदृष्ट्या पहाता खरोखरच हे लेखन वरवरचं म्हणायला हवं, हे त्यांनी प्रांजळपणे कबूल केलं! ¤

## मुक्काम वसई...

वसईच्या थॉमस बॅप्टिस्टा शाळेनं नुकताच एक आरोग्यविषयक कार्यक्रम सादर केला. आरोग्यविषयक प्रदर्शन, विनामूल्य तपासणी, रक्तदानशिबीर आणि आरोग्यविषयक प्रश्नाना डॉक्टरांकडून उत्तरं असा हा भरगच्च कार्यक्रम होता. विनामूल्य तपासणीला भरघोस प्रतिसाद अर्थातच मिळाला. शंकासमाधानासाठीही तज्ज्ञ डॉक्टरांच्या पॅनेलवर प्रश्नांचा मारा झाला. स्त्रीरोगतज्ज्ञ, अस्थिशल्यचिकित्सातज्ज्ञ, जनरल प्रॅक्टिशनर, फिजिशियन, मानसशास्त्रज्ञ असे निरनिराळ्या क्षेत्रांतले तज्ज्ञ जवळजवळ दोन तास प्रश्नाना उत्तरं देत होते. जांभई, उचकी, ढेकर म्हणजे काय, असले बारीकसारीक प्रश्न उंची वाढवण्याची औषधे वापरावीत का? कॅन्सर म्हणजे काय? असले गंभीर प्रश्न, मृत्यु होतो म्हणजे काय? असले जिज्ञासू प्रश्न हिस्टेरिया रोग आहे की ढोंग? भूतबाधा होते का? असले चकवणारे प्रश्न, डॉक्टरांना दुष्परिणाम माहीत असूनही ते धूम्रपान का करतात असे खटपाळ प्रश्न या कार्यक्रमात विचारले गेले. डॉक्टरांची साखळी असते का? आणि डॉक्टर धंदा करतात की व्यवसाय? या दोन प्रश्नांना उपस्थित डॉक्टरांनी मोठ्या हुषारीनं समर्पक उत्तरं दिली. 'जसा तुमचा वाणी, धोबी ठरलेला असतो, विश्वासातला असतो, तसा आमचाही केमिस्ट, स्पेशॅलिस्ट ठरलेला असतो। यात साखळीचा प्रश्न कुठे येतो?' आणि 'डॉक्टरांची वृत्ती व्यावसायिकाची असते; पण मी 'व्यवसाय' करतो, म्हणून माझा पेशंट माझं बिल बुडवतो; मात्र दवाखान्यातली खुर्ची दुरुस्त करण्याचं त्याचं बिल तातडीनं वसूल करतो. कारण तो त्याचा 'धंदा' असतो! हा कुठला न्याय?' या उत्तरांमुळे कटुता येण्याचं सफाईनं टळलं!

खास उल्लेख करावासा वाटतो तो त्यांच्या आरोग्यविषयक प्रदर्शनाचा! शाळा–शाळांमधून वर्षाच्या वर्षाला गॅदरिंग भरवणं, सहली काढणं इत्यादी 'चाकोरीबाहेरच्या गोष्टी' अगदी 'चाकोरीबद्धपणे' केल्या जातात. प्रदर्शन हा तसाच एक प्रकार. त्यामध्ये मुलांच्या 'सुप्त कलागुणांना वाव' इत्यादी मिळणार असतो. शाडूचे ओबडधोबड गणपती, मसुरीची डाळ चिकटवून लिहिलेलं 'श्रीगणेशाय नमः,' चिंध्यांच्या पिशव्या, बाटल्यांचे बंगले इत्यादींचं रुखवत अशा प्रदर्शनात मांडलं जातं.

या आरोग्यविषयक प्रदर्शनात मुलांनी आरोग्यविषयक चित्रं काढली होती. शरीरसंस्थेचं कार्य सांगणारे, रोगांचं वर्णन करणारे तक्त या कार्यक्रमात मांडले होते. काही सोपे शास्त्रीय प्रयोगही तिथे करून दाखवले जात होते. विशेष म्हणजे नायर रुग्णालयाच्या सौजन्यानं, मेंदू, हृदय, फुप्फुसं यांसारखे मानवी शरीराचे डिसेक्टेड अवयवही या प्रदर्शनात उपलब्ध झाले होते. अर्थात प्रदर्शनात शिक्षकांचा सहभाग तर असणारच; पण ज्या उत्साहानं प्रदर्शनाची पूर्ण जबाबदारी आपल्यावर असल्याच्या थाटात शाळकरी मुलं उत्साहानं वावरत होती, ते पहाणं मोठं सुखद होतं. टेबलामागची बारा–पंधरा वर्षांची चुणचुणीत मुलं येणाऱ्या–जाणाऱ्याना माहिती देत होती. प्रश्नोत्तरांसाठी आलेल्या डॉक्टरांना समजावून सांगत होती–हा लहान मेंदु, हा मोठा मेंदु, हे फुप्फुस. इथं रक्त शुद्ध होतं. कॅन्सर झालेलं फुप्फुसं असं दिसतं. टी. बी. झालेलं असं!

माझ्या मनात आलं, जितक्या आत्मीयतेनं ही मुलं हिन्दी गाणी लक्षात ठेवू शकतात, तितक्याच आत्मीयतेनं सायन्सच्या पुस्तकातली बाईंनी निवडून दिलेली ही माहितीही त्यांनी आपलीशी केली आहे. हे सारं त्यांच्यात थेटपर्यंत पोचलं आहे का? वसई आणि आजूबाजूचा परिसर 'शहरी' या संज्ञेत फारसा न बसणारा. या साऱ्या शास्त्रीय माहितीचा संदर्भ या मुलांना आपल्या प्रत्यक्ष जीवनात त्यांना लागतो आहे का?

एक मुलगा सांगत होता, डास! मलेरिया पसरवतात. डास वाढू देऊ नका. त्यासाठी तुमच्या घराभोवती डबकी साठू देऊ नका.– 'तुझ्या घराजवळ आहे का रे डबकं साठलेलं?' मी त्याला अभावितपणे विचारलं.

'छे. मुळीच नाही. मी शिकतोय न हे सारं!' त्या मुलानं मोठ्या अभिमानानं उत्तर दिलं.

भारताचा खराखुरा भावी आधारस्तंभ! मला दिलासा मिळाला.

–ललिता बर्वे


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

## सप्रेम नमस्कार....

दि. २६ जाने. १९८२

संपादक,

साप्ताहिक 'माणूस'

तुमच्या १६ जानेवारीच्या अंकात पान एकवर मुबईच्या 'रेस्ट न्यू वे' आयोजित सत्यनारायणावर काही मजकूर आहे. तुमच्या बातमीदाराने ज्या थाटात तो लिहिला आहे, त्या थाटात उत्तर देण्यापेक्षा मुद्द्यापुरते लिहितो.

(१) विवेचनाला जागा होती असे तुमचे बातमीदार लिहितात. हॉल ओसंडून लोक बाहेर बसत होते. तेथे थोडी जागा होती आणि ती सुद्धा काही वेळेस. प्रचंड गर्दी नसती तर निषेधाचा आटापिटा कशासाठी चालला होता ? आणि कोणाचा ? विवेचनासाठी हॉल ओसंडून जाणारी गर्दी, छायापुराव्याच्या रूपाने आहे. छापणार असल्यास पाठवतो. (नको–सं.)

(२) एखाद्या विषयावर 'माणूस'ला माहिती पाहिजे असल्यास 'माणूस' पत्र देऊन प्रतिनिधी पाठवू शकतो. तसा त्यांनी पूर्वी पाठविलेलाही आहे आणि अपूर्ण का होईना, वृत्तांत छापला आहे. हीच पद्धत या वेळीही स्वीकारता आली असती.

(३) मूठभर निषेधक गेल्या वर्षीही आले होते. त्यांना ६४ पाने उत्तरे दिली. दीड तास ही उत्तरे जाहीर दिली. त्याचे पुस्तक तेथेच होते. ते तुमच्या बातमीदारास दिसले नाही काय? लेखी वचनभंग केलेल्या लोकाना पुन्हा पुन्हा तीच उत्तरे काय देणार ?

(४) तुमच्या बातमीदाराची विधाने इतकी चूक आहेत की, 'कशाचा इन्कार करावा तेच समजत नाही. दलित सेवा, झोपडपट्टीतील सेवा, रक्तदानानंद, खेडेगावातले मेडिकल कॅम्प्स् वगैरेही सत्यनारायणाचे स्वरूप आहेत हे आधीच जाहीर केले होते. (श्रद्धावानापुरते नेहमीचे सत्यनारायण पण शिऱ्याला विकलेले नको अशी स्पष्ट घोषणा होती.) १००८ पूजांची संख्या ओलांडून गेली ती बव्हंशी समाजसेवेच्या संकल्पनामधूनच. सर्व कार्य रजिस्टर्ड चॅरिटेबल ट्रस्टतर्फे चालते, जेथे स्वामीजी ट्रस्टी नाहीत. 'माणूस' सारख्या जबाबदार संपादकाने काही निश्चित प्रश्न विचारले तर त्यावर उत्तर देणारे संदर्भ अवश्य पाठवले जातील व नंतर चर्चाही होईल. बुद्धिनिष्ठ, ज्ञानप्रवृत्त चर्चा हाच आमच्या कार्याचा प्राण आहे. अर्थात नुसती चर्चा नव्हे, भरीव कार्यासह.

—श्री. का. कानपिळे

# गोएंका जिंकले!

अखेर गोएकाशेठजीनी कामगारनेते डॉ. दत्ता सामंत याच्यावर बाजी मारलीच ! कारण कायमचीच बंद होणार म्हणून गाजत असलेली इडियन एक्स्प्रेसची प्रकाशने त्यांनी दिनाक २० फेब्रुवारी १९८२ पासून पूर्ववत सुरू केली. डॉ. दत्ता सामंताच्या कामगारांना बाहेर ठेऊन !

इंडियन एक्स्प्रेसची प्रकाशने जवळजवळ ११० दिवस बद होती. या ११० दिवसांच्या काळात डॉ. दत्ता सामंत आणि गोएंकाशेठ यांच्यात जे काही झाले ते एक युद्धच होते.

युद्धाला सुरवात कोणी केली हा तसा महत्त्वाचा मुद्दा नाही, पण अचानक हे युद्ध सुरु झाले हे खरे. इंडियन एक्स्प्रेस ग्रुपचे कामगार गेल्या वर्षापासूनच डॉ. सामंताकडे येत होते. डॉ. सामंतांनी आपले नेतृत्व स्वीकारावे आणि एक्स्प्रेसमध्ये लढा पुकारावा, ही या कामगारांची इच्छा होती.

नव्वद टक्के कामगार स्वत.कडे आल्याशिवाय डॉ. सामंत कोणाचेही नेतृत्व स्वीकारत नाहीत, असा त्यांचा मुंबईत लौकिक आहे. इतके कामगार त्यांच्याकडे आले असतील, म्हणूनच त्यांनी एक्स्प्रेसचे नेतृत्व स्वीकारले, असं म्हणायला मग हरकत उरत नाही.

आपले कामगार डॉ. सामंतांच्याकडे गेले आहेत, ही जाणीव गोएंकाना झाली नसेल तरच नवल ! आज फक्त सुरवातच आहे. उद्या जर परिस्थिती हाताबाहेर गेली तर त्या डॉक्टराचे तोड पहावे लागणार, या कल्पनेनेच गोएंकाशेठ संतापले असतील. त्यांनी डॉ. सामंतांच्या या युद्धात उडी घेण्याचे ठरवले. पराजयासाठी नव्हे, तर जय प्राप्त करून डॉ. सामंतांना पराजित करण्यासाठी !

हा काळ लोकसत्ता आणि इंडियन एक्स्प्रेस यांच्या भरभराटीचा काळ होता. पत्रकार अरुण शौरी यांनी या दोन वृत्तपत्रांतून अंतुल्यांच्या विरुद्ध जोरदार तोफ डागली होती. अंतुल्यांच्या बाबतीतील एक एक गुपित रोज वाचकांना वाचावयास मिळत होतं. केव्हा एकदा उजाडतं आणि लोकसत्ता, एक्स्प्रेस आपल्या हातात पडतो अशी लोकांची अवस्था झाली होती.

ह्याच सुमारास म्हणजे दिवाळीनंतर, डॉ. सामंतांच्या कामगारानी ओव्हरटाइम आणि लच टाइममध्ये काम करण्याचं नाकारलं. झालं ! गोएंकांना एवढं कारण पुरेसं वाटलं ! कामगारांनी लंच–टाइममध्ये काम न केल्याने आणि ओव्हरटाइम नाकारल्याने त्यांचा उत्पादनावर भयंकर परिणाम झाला. लोकसत्ता व इंडियन एक्स्प्रेसच्या काही प्रतीही त्यामुळं परत आल्या, असंही ऐकावयास मिळालं. डॉ. सामंतांनी युद्धासाठी अशा प्रकारे मैदानात पाय ठेवताच गोएंकांनी थेट तोफ डागली आणि आपण आपली वृत्तपत्रेच बंद करीत असल्याचे जाहीर केले.

डॉ. सामंतांनी गेल्या दहा–पंधरा वर्षांत बड्याबड्या शेठजीना नमवलं आहे. त्यांच्याशी ज्या पद्धतीने आपण लढाई खेळलो त्याचपद्धतीने गोएंकांबरोबरही खेळावी असं डॉ. सामंतांनी मनात ठरवलं असल्यास नवल नाही. पण पहिल्याच क्षणी गोएंकाशेठ असं काही करतील याची कल्पना डॉ. सामंतांना तरी होती का नाही कोण जाणे ! पण हे असं घडलं खरं !

१५ फेब्रुवारी १९८२ पासून आपण इंडियन एक्स्प्रेसची सर्व प्रकाशने कायमची बंद करीत आहोत, असं गोएंकाशेठजीनी जाहीर केलं. त्यासाठी त्यानी एकीकडे 'क्लोजर' साठी अर्ज केला, तर दुसरीकडे टाळेबंदीसाठी डॉ. सामंतांनी ज्या मागण्या टाकल्या आहेत त्या वाजवी नसल्याने त्या देण्यापेक्षा आपण आपली प्रकाशनेच बंद करू, अशी भूमिका घेतली. पालेकर अवॉर्डप्रमाणे वेतन आणि २० टक्के बोनस दिला असताना ३० टक्के बोनस मिळावा, ही कामगारांची भूमिका हटवादी

असल्याचेही सांगण्यात आले.

गोएंकाशेठजींच्या या पवित्र्याने डॉ. सामंतांचेच कामगार प्रथम हादरले. कामगारक्षेत्रात काम करण्याची डॉ. सामंतांची एक पद्धत आहे. एखाद्या ठिकाणी संप किंवा टाळेबंदी सुरू झाली की, पहिले तीन-चार महिने डॉ. सामंत म्हणावे तसे तिकडे लक्ष देत नाहीत. पत्रके,खुलासे तर काढत नाहीतच, पण एक्स्प्रेसच्या बाबतीत हा पायंडा मोडला गेला. डॉ. सामंतांचे हे कामगार निरनिराळ्या व्यक्तींबरोबर वाटाघाटींसाठी स्वतःहोऊन प्रयत्न करू लागले. वृत्तपत्रांकडे निवेदने-खुलासेही देऊ लागले. हे डॉ. सामंतांच्या सांगण्यावरून करण्यात आलं की, त्यांना न विचारताच या कामगारांनी हे केलं, या प्रश्नाचं उत्तर मी देण्यापेक्षा त्यांच्याच एका लीडरने परवा मुंबईच्या ओव्हर मैदानावर दिलं. तो लीडर आपल्या भाषणात म्हणाला, "सध्या डॉ. सामंत आपल्या हाताला लागणं मोठं कठीण काम आहे. ते खूप प्रयत्नांती भेटतात आणि भेटलेच तर कामगारांच्या अफाट गर्दीमुळे पाच-दहा मिनिटांपेक्षा जास्त बोलत नाहीत."

तर प्रथमपासूनच एक्स्प्रेसचा कामगार डॉ. सामंतांच्या नेहमीच्या चाकोरीत राहिला नाही. याच सुमारास आणखी एक अफवा उठली. ती म्हणजे, पत्रकार अरुण शौरींचे तोंड बंद करण्यासाठी अंतुल्यांनी डॉ. सामंतांना विश्वासात घेऊन एक्स्प्रेसमध्ये हा संप घडवून आणला. या गोष्टीला प्रारंभीच मी अफवा म्हटलं. कारण अंतुल्यांनी हा संप घडवून आणला असं मला तरी वाटत नाही. डॉ. सामंतांच्या युनियन ऑफिसमध्ये मी नियमित थोडा वेळ बसतो. संप चालू होण्याच्या जवळजवळ सहा महिने आधीपासूनच हे कामगार डॉ. सामंतांकडे येत होते.

पण लोकांचा या गोष्टीवर विश्वास बसला की, अंतुल्यानीच हा संप घडवून आणला.

पण या सर्व काळात डॉ. सामंतांना एक्स्प्रेसकडे म्हणावे तसे लक्ष देता आले नाही. याच काळात बेस्टमध्ये, गिरणीमध्ये डॉ. सामंतांनी घट्ट पाय रोवले. कामाचा व्याप वाढला आणि ज्या पद्धतीने युद्धात डावपेच टाकावयास हवेत ते त्यांना जमत असूनदेखील जमलं नाही.

अशा प्रकारे डॉ. सामंतांची पकड ढिली झाल्याचे जाणवू लागताच काही कामगार एक्सप्रेसच्या अंतर्गत युनियनकडे वळू लागले. याच दरम्यान महाराष्ट्र सरकारनेही प्रकाशने कायमची बंद करण्यास परवानगी नाकारली. दरम्यान ही प्रकाशने पूर्ववत सुरू करा, अशी विनंती गोएंकांकडे अंतर्गत युनियनने केली. एक्सप्रेसच्या व्यवस्थापकांनी या गोष्टीची दखल घेऊन टाळेबंदी उठवत असल्याचे व प्रकाशने पुन्हा सुरू करीत असल्याचे जाहीर केले. मात्र शिस्तीचे पालन करून योग्य ते उत्पादन देऊ असे हमीपत्र कामगारांनी लिहून दिले, तरच ही प्रकाशने सुरू होतील, असे व्यवस्थापकांनी जाहीर केले.

या सर्व राजकारणाला, हेव्यादाव्याला कंटाळलेल्या कामगारांनी हमीपत्र लिहून देऊन कामास सुरुवात केली आणि मग २० फेब्रुवारीपासून वाचकांचा आवडता लोकसत्ता बाहेर येऊ लागला.

अंक बाहेर येणे ही गोष्टच डॉ. सामंतांचा पराभव दर्शवते. शेवटी हे एक युद्धच होते. युद्ध म्हटलं की, जय-पराजय हा आलाच ! युद्धाचा निकाल लागल्यानंतर त्याने अमुक शस्त्रे वापरली, अमूक मूल्ये पायदळी तुडवली, त्याला अमक्याने साथ दिली असे म्हणणे म्हणजे रडी खाण्याचाच प्रकार होय.

लोकसत्ता-इंडिअन एक्सप्रेस वृत्तपत्रे बाहेर आल्यानंतर या पत्रावरती वाचकांनी बहिष्कार टाकावा, असं आवाहन डॉ. सामंतांनी केलं. गोएंकाशेठजींनी सरकारची आणि पोलिसांची मदत घेऊन लोकशाही मार्गाने चाललेल्या संपाला चिरडून टाकले, अशी टीका काही कामगार करीत आहेत; पण युद्धात जय आणि पराजयही मोठ्या दिलाने पचवावा लागतो, मान्य करावा लागतो आणि त्याच्या आधारावरच पुढील युद्धासाठी तयारी ठेवून डावपेच आखावे लागतात.

एक्सप्रेसमधील या पराभवाचा परिणाम इतरत्र काहीच होणार नाही, असं समजणं मूर्खपणाचे ठरेल. याचा परिणाम गिरणी-कामगारांच्या संपावरती काहीच होणार नाही, असं म्हणण्याचं धाडस मी या घडीला तरी करू इच्छित नाही; पण या पराभवाची दखल डॉ. सामंतांनी घ्यावी आणि पुढील डावपेच रचावेत, एवढेच सांगू इच्छितो.

— मोहन शं. कुलकर्णी
मुंबई, २४।२।८२


तिसरी आवृत्ती



सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची मान्यता लाभलेले हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# चाकोरीत न बसणारा विचारवंत : कै. नरहर कुरुंदकर

मृत्यू अटळ असतो ! आणि त्याचे एकमेव लक्षण दु.खच आहे, हे सत्य आहे. प्रा. कुरुंदकरांचा मृत्यू हे कित्येकाना वैयक्तिक दु.ख देऊन गेले असणार. त्यांचा महाराष्ट्रात पसरलेला मित्रपरिवार, शिष्यपरिवार फार मोठा होता. त्याचा मृत्यू अनपेक्षित आणि म्हणून जास्त दु:खदायी होता. अनेक विरोधाभासांनी भरलेल्या त्याच्या आयुष्याचा हा असा शेवट असावा, हाही एक योगायोग नाही काय ? कारण एका आनंददायक समारंभाची पार्श्वभूमी त्यांच्या मृत्यूला होती.

वयाच्या १४–१५ व्या वर्षांपासून राजकीय चळवळीचे संस्कार झालेला हा बुद्धिमान माणूस, तत्त्वज्ञानासारख्या विषयाच्या अंतरंगात घुसून, त्या विषयाचे मर्म अती सुलभपणे सांगत असे. रझाकार चळवळीसारखी आत्यंतिक जातीयवादी चवळवळ त्यानी जवळून पाहिली. त्या विषारी चळवळीचे सारे मूळ केवळ जातीयच होते, तो वर्गकलह नव्हता, असे त्यांच्या समाजवादी मित्राना त्यानी आग्रहाने सांगितले.रझाकारांचे जातीय अत्याचार अत्यंत संस्कारक्षम वयात पाहिलेले आणि तरीही मुस्लिमांबद्दलचा एक तर्कनिष्ठ, उदार दृष्टिकोन त्यानी अत्यंत निर्भिडपणे मांडला आणि रा. स्व. संघाचा हिंदुराष्ट्रवाद यावर कठोर हल्ले केले. संघाच्या तत्वज्ञानावर अत्यंत तर्कनिष्ठ, बुद्धिवादी आणि सुसंबद्ध हल्ले चढविणारा प्रा. कुरुंदकर हा एकच विद्वान मी पाहिला ! बाकी साऱ्याचे आरोप बटबटित आणि नेहमीचेच ! आणि म्हणूनच की काय, कै. गोळवलकरगुरुजींनी म. गांधीना राष्ट्रपिता म्हणून संबोधल्यावर, संघाच्या टीकाकारांनी कै पू. गुरुजी ढोंगी आहेत असा डंका चालू केला, त्या वेळी अशी टीका करणारे समाजवादीच ढोंगी आहेत, कारण कै. गुरुजींची म. गांधीबद्दलची भावना अत्यंत प्रामाणिक आहे, करायचाच असेल तर या घटनेबद्दल आनंद व्यक्त करावयास हवा, असे त्यांनी त्यांच्या गुरु व शिष्यांना ठणकावून सांगितले होते.

बुद्धिवादी आणि प्रामाणिक विद्वानांच्या वाटणीला येणारा उपेक्षितपणा महाराष्ट्राला नवीन नाही. ही परंपरा पार लोकहितवादीच्यापर्यंत मागे जाते. प्रत्येक वेळी बळी जाणारा प्रामाणिक विचारवंत त्या वेळच्या परिस्थितीचा बळी असतो. कारण त्यावेळी लोकमानसावर आरूढ झालेले समाजातील अथवा राजकारणातले धुरीण या विचारवंतांचे पंख छाटू इच्छित असतात. कारण ते गैरसोयीचे असतात. प्रा. कुरुंदकरांच्या वाट्याला आलेला हा उपेक्षितपणा म्हणूनच दु.खदायी असला तरी नवीन नाही. कारण कै. आगरकर हा, त्या काळच्या प्रबळ राजकीय प्रवाहाने घेतलेला एक बळीच आहे.

बुद्धिजीवी वर्गाची काही लाडकी मते असतात. आम्ही अल्पमतातील म्हणून शहाणे कारण शहाणे नेहमीच अल्पमतात असतात, असे काही तरी तर्कविसंगत मत ते कवटाळून धरतात. आणि राज्यकर्त्यांच्या प्रत्येक गोष्टीत चूक काढून त्यांची अवहेलनाच करणे त्यांचा स्वभाव बनतो. पं. नेहरू किंवा म. गाधी यांना झालेला महाराष्ट्रातील विरोध हा या बौद्धिक घमेंडीपोटी आहे असे कुरुंदकरांना वाटे. आणि म्हणून अशा तऱ्हेचा विरोध करणाऱ्यांचे जे प्रतिनिधी ते रा. स्व. संघवाले, त्यांच्यावर ते अगदी तुटून पडत. मराठी वृत्तपत्रसृष्टी, नाही म्हटले तरी रा. स्व. संघाबद्दल आपुलकी बाळगून असते. त्या संघटनेबद्दलचे एक सुप्त आकर्षण साऱ्याच बुद्धिजीवीवर्गाला आहे. कारण नाही म्हटले तरी त्यांचे वेगळेपण तेथे गोंजारले जात असते. आणि मग प्रा. कुरुंदकरांबद्दल कमालीचे गैरसमज सहजपणे पसरतात.

मुळात ज्ञानार्जन हे केवळ ज्ञान मिळविण्याच्या आनंदासाठीच असते, या संस्कारात ते वाढले: भालचंद्रमहाराज कहाळेकरांनी त्यांचेवर केलेले संस्कार तेच होते. पण त्याच वेळी त्यांनी स्वत.च नमुद केलेला आणखी एक संस्कारही त्यांच्यावर, त्यांच्या मुस्लिम शिक्षकांनी केलेला होता. मते मांडावीशी वाटल्यास अथवा त्यानुसार प्रामाणिकपणे कृती करावीशी वाटल्यास करणेस हरकत नाही. पण मग त्याची किंमत चुकविण्याची मनाची तयारी हवी. प्रा. कुरुंदकरांनी किंमत मोजली, फार मोठी किंमत मोजली ! नियतीने त्यांना मोजायला लावलेली किंमत त्यांच्यावर फार अन्याय करणारी होती.

नामांतर आंदोलनाला त्यानी केलेला विरोध अत्यत तर्कशुद्ध तर होताच पण राष्ट्रवादी होता. पडद्यामागच्या काही घटना अज्ञात असणारांना मात्र तो विरोध जातीय वाटत होता. त्यात कुरुंदकर अगदी श्रद्धेने जानवे घालणारे. ब्राह्मण होते. मग त्यांना धोपटणे अगदी सोपे होते. बरे, ज्या दलिताना त्याना झोडपायचे होते त्याना माहीत होते की, कुरुंदकर काही गोष्टींची वाच्यता करू शकत नाहीत आणि म्हणून अगदी शारीरिक हल्ला करण्याइतपत त्याची मजल गेलेली. (आणि तिथंच, केवळ मंगलावरतीच श्रद्धा असणारा कनवाळू हृदयाचा हा कठोर बुद्धिवादी खचला !) ज्यांच्याकरता आयुष्यात कष्ट घेतले, प्रसगी आयुष्य पणाला लावले, त्यांच्याकडूनच झालेली ही परतफेड त्यांच्या मनाला वेदना देत होती.

समाजाला दिशा दाखविण्यासाठी चाललेला अट्टाहास हा एकाकी प्रवास आहे.



# नमन नटवरा...!

संगीत रंगभूमी म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचा अविभाज्य भाग. काळाच्या पडद्याआड जाऊ पहात असलेला संगीताचा हा खजिना आजच्या पिढीला खऱ्या अर्थाने अनुभवायला मिळाला नाही मात्र संगीत नाटकाच्या अंतरंगात सूर लावणारे आणि सूर मारणारे डॉ. वसंतराव देशपांडे गतकाळाचा पडदा अलगदपणे दूर करतात आणि मग जाणवतं की या व्यासंगी कलावंतानी असंच गात रहावं, असंच बोलत रहावं.
" मराठी संगीत नाटकाची वाटचाल " म्हणजे नाट्यसंगीताची तीन तासांची एक अनोखी मैफिल आणि डॉ. वसंतरावांना बोलतं केलंय श्री. वपु काळे यांनी.
मनोरंजनाबरोबरच नवीन काहीतरी देण्याचा हा प्रयत्न.
आता दोन कॅसेटस्मध्ये उपलब्ध.

## मराठी संगीत नाटकाची वाटचाल

संचालन: वपु काळे,
तबला: शशिकान्त मुळे,
ऑर्गन: संजय देशपांडे

AA 113 भाग: १ रु./५०.- ९० मिनिटे.
AA 114 भाग: २ रु./५०.- ९० मिनिटे.

## अलूरकर म्युझिक हाउस

४, स्वप्ननगरी, कर्वे रोड, पुणे-४११ ००४. फोन ३०६६२, ३२९१०,

सर्व प्रमुख पुस्तक व रेकॉर्डस् विक्रेत्यांकडे उपलब्ध.

PROGRAF

### अधिकृत प्रमुख विक्रेते :

**मुंबई :** जी. जे. घैसास आणि कं.; गिरगांव. जयहिंद इलेक्ट्रॉनिक्स, नवजीवन सोसायटी. रेडिओ पॅलेस, गिरगांव. ऑडिओ सेल्स कॉर्पोरेशन. **ठाणे :** सौ. कविता द्रविड. **पुणे :** व्हीनस म्युझिकल हाउस, लक्ष्मीरोड. रोहित एंटरप्राइझेस, पुणे–१. मॅजेस्टिक बुकस्टॉल. **सातारा :** देवकुळे वॉच कंपनी. **सांगली :** एशियन रेडिओ. **कोल्हापूर :** पाठक ॲण्ड सन्स. ईगल रेडिओ हाउस, अजब पुस्तकालय. **सोलापूर :** वैशाली रेडिओ. **बेळगाव :** नवसाहित्य. **गोवा :** व्ही. पी. सिनारी, पणजी. **नागपूर :** ए. डी. इलेक्ट्रॉनिक्स, सिताबर्डी. **नासिक :** एस्. एम्. देव. **औरंगाबाद :** नरीमन ॲण्ड सन्स. **वर्धा :** आर. के. इलेक्ट्रॉनिक्स. **जळगाव :** स्वरविहार. **इंदोर :** विनिता एंटरप्राइझेस. **लातूर :** लातूर फोटो स्टुडिओ. **धुळे :** साहित्यवितरण. **अहमदनगर :** आर्. डी. कराचीवाला. **हैद्राबाद :** कालिदास रेडिओज.


याची जाणीव त्यांना झाली, त्या वेळी नियती त्यांच्याशी क्रूर खेळ खेळली. जिथं त्यांचा वैचारिक पिंड बनला, ज्यांना गुरु मानलं, मार्गदर्शक मानलं त्यांनीही त्यांना समजून घेतले नाही. त्यांना झोडपलच ! हे दुःख न पचविण्याजोगं होतं. दुसरीकडे आपल्या मतांमुळे आपल्याला पितृवत् असणाऱ्यांना त्यांची चूक नसताना त्रास होतो आहे, ही क्लेशकारी जाणीवही त्यांना होती; पण तिथंही ते असहाय्य होते.

या समाजाचे भले करण्यासाठी काही विचार द्यावयास हवेत. मग ते सेवादलाच्या शिबिरातले असोत किंवा मिरजेच्या वसंत व्याख्यानमालेत असोत. प्रा. कुरुंदकर विचार देत गेले. इतिहासाच्या अभ्यासाला नवी राष्ट्रवादी दृष्टी असावी; रामदास हा संत खऱ्या अर्थाने राष्ट्रसंत होता. कारण 'काशी' धर्मपीठ मुक्त व्हावे असे त्यांना वाटे; त्यांच्या स्वप्नातले आनंदवन काशी होते; भारताची वैज्ञानिक परंपरा फार जुनी आणि मोठी आहे; गणतंत्रपद्धती भारताचीच आहे, इतकेच नव्हे तर तिला लांब रुंद १२०० वर्षांची परंपरा आहे, असे विचार ते मांडीत असताना काही पापशंकी समाजवाद्यांना ते छुपे संघवादी झाल्याचा साक्षात्कार झाला. वास्तविक भारताच्या गौरवशाली परंपरांचा अभिमान ही काही संघाची मक्तेदारी नाही आणि नव्हती. अगदी स्वर्गीय पं. नेहरूंनीही त्याबद्दल विस्ताराने लिहिले आहे. पण कुरुंदकरांच्या कुंडलीतील काही ग्रहच असे असावेत की, त्यांच्या वाट्याला गैरसमज आणि म्हणून हेटाळणीही यावी !

विद्वतेची, अभ्यासू वृत्तीची परंपरा संपत आलेली असताना प्रा. कुरुंदकरांचे अकाली, उमेदीच्या वयातले निधन फार वेदना देणारे आहे. पण त्यांच्या वाट्याला आलेले जीवन त्यापेक्षाही वेदनादायकच होते. मला तर लोहियांच्या मृत्यूचा प्रसंग आठवला. 'He died with all regrets'. नियती या माणसांच्या कपाळावर हा लेखच का लिहिते ? याचं उत्तर मिळत नाही !

**– आनंद बागलकोटे, मिरज**

## उत्तरमीमांसा : ४०

स. शि. भावे

# 'दर्शनी' खेळाडू आणि 'खरे' खेळाडू

खरे खेळाडू कोण असतात आणि ते कोणाशी खेळत असतात ?

सुनील गावसकर आणि कीथ फ्लेचर यांना खेळाडू म्हणूनच ओळखले जाते. सुरजीतसिंग आणि मेर्विन फर्नांडीस यांनाही खेळाडू म्हणून ओळखले जाते. युवराज पाटील आणि सत्पाल हेही खेळाडू म्हणूनच ओळखले जातात.

हे खेळाडू खेळ खेळतात. सामने लढतात. कसब दाखवतात. विक्रम करतात. विक्रम मोडतात. प्रेक्षकाचे मनोरंजन करतात. त्यांच्या अंतःकरणात मानाचे स्थान मिळवतात. ब्रॅडमन, सोबर्स, विजय मर्चंटसारखे अमरदेखील होतात !

या दृष्टीने या साऱ्या खेळणाऱ्यांना खेळाडू म्हणायला हवे; पण खरे खेळाडू हे नसतात. त्यांचे खेळही क्रिकेट, हॉकी किंवा कुस्ती हे नसतात.

हे खरे खेळाडू कोण आणि त्यांचे खरे खेळ कोणते, हे पाहण्याआधी वर उल्लेखिलेल्या या दर्शनी खेळाडूंच्या खेळाचा यंदाचा रग कसा आहे, ते पाहू या.

¤

नुकतीच भारत आणि इंग्लंड यांतील क्रिकेट–कसोटी संपली. हजारो प्रेक्षकानी स्वतःच्या श्रमांचे पैसे खर्चून हे सहा कसोटी सामने पाहिले. भारताने १–० अशी मालिका जिंकली. तरीही, भारतीय प्रेक्षकांच्या मनाला समाधान मिळालेले नाही. खरा खेळ बघायला मिळाला नाही, अशी त्यांची हुरहूर आहे.

म्हणजे बघा. गावसकरने एका हंगामात ५०० वर धावा पाचव्यादा पुन्या केल्या. विश्वनाथने द्विशतक झळकावले आणि गावसकरचे इंग्लंडविरुद्धचे रेकॉर्ड मोडले. कपिलदेवने झंझावाती खेळ करून कसोटीतले दुसरे शतक झळकावले. शर्माने दुसरे शतक लावले आणि इंग्लंड–दौऱ्यातले आपले स्थान पक्के केले. प्रणव रॉयने तंत्रशुद्ध खेळाने छाप पाडली आणि गावसकरचा जोडीदार कोण, हा प्रश्न सोडवला. भारताने मालिका जिंकली, इतकेच नव्हे तर सबंध मालिकेत वरचष्मा टिकविला! चार कसोटयांत पहिल्या डावात प्रतिपक्षावर मात केली. संघवृत्ती टिकवली. गावसकरने कप्तान म्हणून आपले कौशल्य प्रकट केले....आणि इतके असूनही प्रेक्षक असमाधानीच ! असे का व्हावे ?

भाकरी का करपली इत्यादी तीन प्रश्नांचे जसे एक उत्तर आहे तसे, क्रिकेट–कसोटी–मालिका का कंटाळवाणी झाली, या प्रश्नाचेही उत्तर एकच आहे. ते उत्तर असे की, या मालिकेत खेळातली खरी चुरस नव्हती. जिवंत, रसरशीत, खेळाडूंना आणि प्रेक्षकांना तापविणारी चुरस हा खेळाचा खरा प्राण ! अशी चुरस या कसोटी–मालिकेत नव्हतीच.

ही चुरस नव्हती हे सारेच मान्य करतात. मात्र याची जबाबदारी दुसऱ्याकडे जाते, असे सारे म्हणतात.

इंग्लिश क्रीडा-समीक्षकाच्या मताने भारतीय पंच आणि भारतीय खेळपट्टया आणि भारताचे डावपेच यामुळे इंग्रजी संघ नाउमेद झाला आणि म्हणून चुरस संपली !

त्याच्या मते, आपले पंच पुरेसे तज्ज्ञ नव्हते आणि निरीक्षणकुशलही नव्हते. शिवाय ते पक्षपाती होते. त्यांचे अनेक निर्णय ऐनवेळी इंग्रजी संघाविरुद्ध गेले. अशा परिस्थितीत त्याच्या खेळाडूंचा उत्साह कसा टिकणार ?

भारताने खेळपट्टया अगदी निर्जीव, ठणठणीत बनवल्या होत्या म्हणून त्यांचे द्रुतगती गोलंदाज फिके पडले; पण मग भारतीय फलंदाजांप्रमाणे तुमचे फलंदाज का टिकले नाहीत, असे कोणी विचारले, तर उत्तर तयार आहे : पंच! त्यांनी चुकीचे बादनिर्णय दिले. भरीस भर म्हणून अपुऱ्या प्रकाशाबाबत भारतीय फलंदाजांनी केलेल्या तक्रारी सतत उचलून धरल्या !

भारताचे डावपेच नकारात्मक आणि वेळकाढू होते, अशीही त्यांची तक्रार आहे. म्हणजे विलहीस, बोथम, डिली, लीवर यांना षटक टाकायला साडेतीन काय चार मिनिटे लागली तरी ते समजू शकते ! हे सारे द्रुतगती गोलंदाज आहेत. त्यांची चेंडू टाकण्यापूर्वीची धाव खूप लांब असते. त्यांना वेळ लागणारच; पण दोशी आणि रवि शास्त्री या फिरकी गोलंदाजांना असा वेळ लागावा हे महापाप झाले. हे फिरकी टाकतात. त्यांची धाव छोटी असते. त्यांनी जादा वेळ घेणे हे बरोबर नाही.

जे गोलंदाजीचे तेच फलंदाजीचे. बॉयकॉट फार संथ खेळला, असे तुम्ही म्हणाल, तर तो तसा खेळणारच. कारण त्याचा स्वाभाविक खेळच तसा आहे. शिवाय, तो विक्रम करायलाच इथे आला होता. विक्रम झाल्यावर तो कसा बिनतक्रार परत गेला ! तेव्हा बॉयकॉट एक असा खेळला म्हणून काय रवि शास्त्रीने तसे खेळावे ?

इंग्रजी खेळाडूंच्या आणि क्रीडा-समीक्षकाच्या या तक्रारी नव्या नाहीत. मला खेळ समजायला लागल्यापासून जरी आठवले तरी तेव्हापासून ते असाच रडीचा डाव खेळत आले आहेत. त्यांचा संघ कमी धावात बाद झाला की, ते आधी पंचांना दोष देतात, नंतर खेळपट्टीला. लॉर्डस्‌वरील त्यांच्या घरच्या खेळपट्टीवर देखील पराभवाच्या प्रसंगी एखाद्या उंचवटयाची धोकादायक रेघ उमटलेली असते. अन्य संघांना ते खंडीभर दोष देतात. त्यांच्या पराक्रमाची स्तुती करण्यात मात्र ते कमालीचे कंजूष असतात. रामदीन आणि व्हॅलेन्टाइन यांनी त्यांचा संघ गुंडाळला तरी ते गोलंदाजीला श्रेय देणार नाहीत. आमचे फलंदाज वाईट खेळले, असेच ते म्हणणार. त्यांच्या फलंदाजांनी धावांचा डोंगर रचल्यावर मात्र ते प्रतिपक्षाच्या गोलंदाजीची स्तुती करणार. कारण अशा स्तुतीने त्यांच्या फलंदाजांची कामगिरी अधिकच उठून दिसते.

अशा अहंमन्य, चिडक्या आणि वरिष्ठ भावनेने या देशात आलेल्या या खेळाडूंशी

गावसकर तोडीस तोड वागला, त्याने त्याचे फाजील लाड केले नाहीत याबद्दल त्याचे कौतुक केले पाहिजे. तुम्ही सावकाश खेळता ना ? मग आम्ही तुमच्यापेक्षा थोडे कमी, पण सावकाश खेळून दाखवतो. (इंग्लंडचा मालिकेतील वेग षटकामागे २.५० धावा. तर आपला २.९५ धावा !) सामन्यात तुम्ही ईर्ष्येने लढतच नाही. मग आम्ही तरी का ईर्षा दाखवू ? तुमचे खेळाडू वैयक्तिक विक्रमावर नजर ठेवून खेळतात.(आणि विक्रम झाल्यावर या देशाला शिव्या देत मायदेशी परत जातात.) आम्हीही मग नवे नवे विक्रम काबीज करू !

मालिका कंटाळवाणी झाली त्यास मूळ जबाबदार इंग्रजांचा संघ आणि नंतर जबाबदार गावसकरचे 'जशास तसे' धोरण! आपले क्रीडासंघटनांचे अधिकारी इंग्रज संघापुढे आणि अधिकाऱ्यांपुढे लांगूलचालन करत असतात. या अपमानास्पद पार्श्वभूमीवर गावसकरचे धोरण स्वाभिमान राखणारे आणि आपल्या संघाच्या दर्जाला शोभणारे आणि म्हणूनच अभिनंदनीय होते, यात शंका नाही !

अर्थात्, मला आणि माझ्यासारख्या अनेकांना खरा आनंद झाला असता तो इंग्रज संघाच्या पुरत्या फजितीने.आपण ही मालिका ४–० अशीच जिंकायला हवी होती. असा दणदणीत मार देण्यायोग्य कौशल्य आणि दम आपल्या खेळाडूत नक्की होता; पण आपल्या खेळाडूंना आपल्या क्रीडा-अधिकाऱ्यांनी मोकळेपणाने खेळू दिले नाही.

या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे आपल्या खेळपट्ट्या तयार केल्या गेल्या. त्या पाच दिवस 'टिकतील' अशा भक्कम बनवल्या होत्या. कारण सामना पाचही दिवस 'चालला' पाहिजे. कारण प्रेक्षकांनी 'सीझन' तिकीटे काढलेली असतात, म्हणून खेळाचा वेग दिवसाला १८०–१९० धावा एवढाच राहिला पाहिजे. या वेगात फक्त एका डावात खंड पडला. तोही आपल्या बाजूने नव्हे.

म्हणजे महत्त्व खेळ 'खेळायला' नाही, तर खेळ 'दाखवायला' आहे. दोन संघांनी एकमेकांशी चुरशीने 'खेळणे' याला महत्त्व नाही, तर तीस ते पन्नास हजार प्रेक्षकांना (आणि दूरदर्शनला डोळे लावून बसलेल्या लाखो प्रेक्षकांना) दोन्ही संघांनी 'मिळून' खेळ करून 'दाखविणे' यालाच महत्त्व उरले आहे.

¤

कारण, सुरवातीला म्हटल्याप्रमाणे, खरे खेळाडू वेगळेच असतात ! दोन्ही देशांतल्या क्रीडानियंत्रक मंडळाचे बडे पदाधिकारी हे आजचे खरे खेळाडू आहेत. क्रिकेट किंवा हॉकी किंवा कुस्ती या खेळांचे सामने लढणारे खेळाडू हे आज केवळ 'दर्शनी खेळाडू' झाले आहेत.

क्रीडामंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या आतरराष्ट्रीय टोळ्या, चुकल्यो, परिषदा असतात. या परिषदा सामन्यांचा कार्यक्रम ठरवतात. हेच सामन्यांच्या आर्थिक अटी ठरवतात.

सध्या सामन्यांना न भूतो एवढा पैसा मिळतो. सहाजिकच, सामन्यांच्या दंगलींची संख्या वाढली आहे. खरे म्हणजे, जागतिक अजिंक्यपद ठरवण्यासाठी दर चार वर्षांनी एक दंगल झाली तर पुरे असायला हरकत नाही; पण अशी एक दंगल या पदाधिकारी सामंतांच्या आर्थिक आणि अन्य महत्त्वकांक्षाना पुरी पडत नाही. म्हणून मग ऑलिंपिक दंगली अधिकाधिक आयोजित केल्या जातात.

यात पैसा, मानमरातब, परदेश–प्रवास, छानछोकी, नियमबाह्य आयात–निर्यात–अशा लाभांचा फायदा या आंतरराष्ट्रीय टोळीच्या सदस्य–सामंताना मिळत असतो.यातल्या अनेकांचा हा उपजीविकेचा व्यवसायही असतो.

आपण सामान्य माणसे या धेंडांना ही चैन पुरवीत असतो. आपण श्रमानी पैसा कमावतो आणि या चैनीत वेड्यासारखा खर्च करतो. प्रसिद्धीमाध्यमातून या चैनीची चटक सामान्य माणसांना पद्धतशीरपणे लावण्यात येते. या माध्यमांना यासाठी लाखो रुपये मोजण्यात येतात. हे रुपयेदेखील हे पदाधिकारी पोचवीत नाहीत. अनेक उत्पादक आपल्या उत्पादनासाठी भरमसाठ पैसा खर्च करून जाहिरात करतात. जाहिरातीसाठी लाखो माणसे एका ठिकाणी जमलेली आयती मिळतात. सामन्यांची दंगल हे केवळ एकत्र जमण्याचे निमित्त असते.

एक दंगल कितीजणांना पैसे मिळवून देते बघा : क्रीडासंघटना, त्यांचा नोकरवर्ग, त्यांचे पदाधिकारी, वृत्तपत्रे, दूरदर्शन, आकाशवाणी, त्याचे प्रतिनिधी, प्रवासवाहतूक–कंपन्या, हॉटेले, क्रीडासाहित्य बनवणाऱ्या कंपन्या, खाद्य–पेयविक्रेते, स्थानिक असंख्य कंत्राटदार आणि शेवटी मैदानात खेळ खेळणारे आपले 'दर्शनी' खेळाडू !

होय. या 'दर्शनी' खेळाडूंचा क्रम या यादीत शेवटचा असतो. कारण त्यांना 'निवडण्या'चा अधिकार संघटनांकडे असतो. 'टेस्ट'मध्ये राखीव म्हणून जरी निवड झाली तरी हल्ली भरपूर पैसे आणि सुविधा मिळतात. कसोटीच्या मानधनापासून गौरवसामन्यातून मिळणाऱ्या थैलीपर्यंत साऱ्या पैशाची सूत्रे नियामक अधिकाऱ्यांकडे असतात. त्या जोरावर ते खेळणाऱ्या 'दर्शनी' खेळाडूंना वंगवतात, हवे तसे वागवतात. एखादा गावसकर त्यांना पुरून उरतो ! त्याच्याशी ते गट्टी करतात आणि त्याला खिशात टाकला की इतरांशी शिरजोरीने वागायला मोकळे होतात !

म्हणून प्रावीण्य हा खेळाडूच्या निवडीचा पहिला आणि अखेरचा निकष कधीच नसतो. प्रांत, जिल्हा, जात, नातेसंबंध, गुलामी वृत्तीने केलेली हांजीहांजी, वरिष्ठांची शिफारस–असे निकष प्रभावी ठरतात ! मुबईच्या हॉकीच्या महत्त्वाच्या सामन्यात नेगीला वगळून अशोक दिवाणला खेळवण्याचा निर्णय कर्णधाराचा नव्हता, तर अधिकाऱ्यांचा होता. या एका निर्णयाने भारताची संधी हुकली !

पण या जय–पराजयाचे क्रीडा–सामंतांना कसलेही सुख–दुःख नसते सत्ता, सत्तासंबंध, परदेशी प्रवास, चैनबाजी आणि पैसा हा त्यांचा खेळ असतो. 'दर्शनी' खेळाडू ही केवळ दरवेशाची अस्वले असतात !

आपला हा खेळ हे क्रीडा–सामंत फार कौशल्याने, निर्दयपणाने आणि कमालीच्या कोडगेपणाने खेळतात. तसे ते पत्रकारांना गटवू चाहतात. काही ठिकाणी ते यशस्वीही होतात; पण 'महाराष्ट्र टाइम्स'च्या वि. वि. करमरकरांसारखे काही पत्रकार जाणकार आणि निर्भीड असतात. अशाच्या टीकेकडे हे सामंत पूर्ण दुर्लक्ष करतात. काही दिवसापूर्वी जपानला जाणाऱ्या कबड्डीचमूच्या निवडीत उघडउघड पक्षपात झाला. करमरकरांनी पत्रकाराला जेवढे करता येईल तेवढे आकाशपाताळ

एक केले; पण परिणामाच्या नावाने रामा–शिवा–गोविंदा !

आपले ' दर्शनी ' खेळाडूदेखील निमूटपणे या खऱ्या खेळाडूंच्या खेळात सामील होतात. व्यावहारिक यशाच्या अपेक्षेने ते मिंधे झालेले असतात. अर्थात अस्सल खेळाडूजवळ जी स्वातंत्र्यप्रवृत्ती असावी लागते, ती त्यांच्याजवळ नसते. त्याच्या या मिंध्या, पराभूत वृत्तीची सावली त्यांच्या खेळातील नैपुण्यावरही पडते आणि बड्या धेंडांच्या पैशाच्या खेळात खेळाचा आणि खेळाडूपणाचा बळी पडतो ! क्रिकेटच नव्हे तर हॉकी, कुस्ती अशा साऱ्याच खेळांना पैशाच्या × × खेळाच्या कॅन्सरची बाधा झाली आहे !

मैदानी आणि मर्दानी खेळातच दर्शनी आणि खरे असे दोन प्रकारचे खेळाडू असतात असे नव्हे. निवडणूक हा जो आधुनिक खेळ आहे त्यातही हे दोन प्रकारचे खेळाडू दिसून येतात.

असा एक खरा खेळाडू माझा मित्र आहे. रमाकांत त्याचे नाव. एका लहानशा खेड्यात तो प्राध्यापक आहे. स्वतःच्या विषयात तो मोठा विद्वान आहे किंवा त्याचे मोठे कर्तृत्व आहे असे नाही. मात्र तो नेहमी विद्वानांच्या घोळक्यात असतो.

विद्वानही त्याला अनौपचारिकपणे आपल्यातला मानतात. त्याच्या खांद्यावर हात टाकून त्याला जवळचा म्हणतात. कारण असे की, विद्वानाचीही काही व्यावहारिक कामे असतात. अशी कामे रमाकांत हौसेने करतो. म्हणून विद्वानांना तो हवाहवासा वाटतो. त्याच्यावर त्यांचा वेगळ्या प्रकारचा वचक असतो.

एक खरे की, अशी व्यावहारिक कामे पार पाडण्यात तो वाकबगार आहे. त्याचे म्हणून एक तंत्र आहे. अत्यंत सौम्य चेहरा आणि त्याहूनही सौम्य भाषा हे त्या तंत्राचे बाह्य रूप आहे.

नुकत्याच झालेल्या एका निवडणुकीत त्याने आपल्या एका मित्राला उभे केले आणि अर्थात निवडूनही आणले ! या निवडणुकीत त्याने केलेल्या कामाची गोष्ट परवाच तो मला सांगत होता. म्हणाला :

' ही निवडणूक तशी कठीणच होती. आमच्या मित्राचा प्रतिस्पर्धी मातब्बर होता. मातब्बर म्हणजे काय विद्वान वगैरे होता. '

इथे मी त्याला थोपवून विचारले; ' तुमच्या विद्यापीठाच्या निवडणुकांत विद्वत्तेला महत्त्व असेल ना ? '

' विद्वत्तेला कसलं महत्त्व रे ? ' एका गालातली तंबाखूची गोळी दुसऱ्या गालात ढकलत तो माझी कीव करीत म्हणाला, ' महत्त्व दुसऱ्याच गोष्टींना असतं. मतदाराप्रमाणे हे महत्त्व बदलतं. '

' म्हणजे कसं ? '

' ऐक. अरे, एकाला सांगायचं की हा आपल्या जिल्ह्यातला आहे. दुसऱ्याला ' मित्रमंडळातला ' अशी ओढ लावायची. जिवलग मित्राचा जिवलग असं तिसऱ्याला सांगायचं. एका शिक्षणसंस्थेची दोन कॉलेजं असली तर दोघाही मतदारांना वरून आदेश आणायचा. अरे, एक महिला मतदार होती. तिच्यावर तर तिच्या पतीकडूनच प्रेमाचा दबाव आणला ! '

' पण ही थोडीशी फसवणूकच होते नाही का ? ' मी विचारले.

' हे बघ. ही निवडणूक आहे. येथे जय महत्त्वाचा ! खेळासारखंच आहे हे. मतदारांनाच काय, आम्ही त्या विद्वान प्रतिस्पर्ध्यालादेखील फसवलं. अगदी मामा केला त्याचा ! '

' तो कसा ? '–मी.

' तीन-चारजणांकडून त्याला पत्रं पाठवली, आमचा पाठिंबा तुम्हालाच. मी स्वतःदेखील लिहिलं. विद्वानच तो. हुरळला ! आणि गाफील राहिला. अरे, आमचा पाठिंबा त्याला आहे, असं जाहीर देखील करून टाकलन् ! '

' मग तुमची पंचाईत झाली असेल ? '–मी.

' छे रे ! आमची कसली पंचाईत ? त्याचाच बावळेपणा उघड झाला. सगळे हसले त्याला. म्हणाले, ' निवडणुकीतली आश्वासनं ज्याला खरी वाटू शकतात असा हा विद्वान ! हा निवडून येऊन तरी काय उपयोग ? पुढंही हा असाच बावळटपणा करणार ! '

' पुढंही म्हणजे ? ' हीं गुंतागुंत. मला बरीच गंमतीची वाटू लागली होती.

' पुढं म्हणजे पुढच्या निवडणुकीत. ', तो उत्साहाने सांगू लागला, ' तिथं देखील मी माझी गंमत केलीच आहे. आपला भालूकाका भोळा आहे ना ? तर त्यालाच आमचा पाठिंबा आहे, असं सगळ्यांना सांगितलं; पण खरं माझ्या मनात नाव आहे ते आमच्या माधवदादाचं ! '

' मग आता रे ? आता भालूकाकालाही गंडा घालणार काय तू ? '–मी.

' ती वेगळीच व्यवस्था केली. पहिल्याच निवडणुकीत भालूकाका पडेल अशी व्यवस्था केली. म्हणजे आता माधवदादा बिनविरोध ! म्हणजे बघ, भालूकाकाला पाठिंबा होता तो आहेच; पण भालूकाकाच खुद्द नाही ! मग काय करणार ? भालूकाकालाही माझा नाइलाज ॲप्रिशिएट झाला. ' तो दिलखुलास आनंदाने सांगत होता.

' पण भालूकाकाला संशय नाही आला ? ' तरीही मी विचारले.

' तो सरळ आहे. शिवाय मी सांगून दिलं की, त्याला प्रतिपक्षानं पाडलं. म्हणालो, ' बाबा रे, विश्वास बसत नसला तर माझा कान धर. जोड्यानं मार ! ' तर हे म्हटल्यावर त्यानंच माझी समजूत काढली ! '

माझ्या सारे लक्षात येत गेलं. रमाकांताचा यशस्वी मित्र, तो विद्वान प्रतिस्पर्धी, भालूकाका, माधवदादा–सारे दर्शनी खेळाडू होते. काही जिंकत होते, काही हरत होते; पण खरा खेळाडू होता रमाकांत ! तो नेहमीच विजयी होत होता. मी त्याला शेवटचा प्रश्न विचारला, ' यात तुला काय मिळतं ? इतकं सारं जर तुला जमतं तर तू स्वतःच का उभा राहत नाहीस ? '

तो म्हणाला, ' इतर क्षेत्रातल्याइतकं नसेल, पण इथंही थोडं-फार मिळतंच. अगदी पैसा–सत्ता असंच नाही; पण तसंच थोडंसं. पण खरं कारण वेगळंच आहे. '

' ते कोणतं ? ' मी माहितगाराच्या उत्कंठेने विचारलं.

तो म्हणाला,

' माझ्या या हालचालीत तुमचं ते ' इस्थेटिक ' समाधान मला मिळतं. दुसऱ्यांना मी खेळायला लावतो तेव्हा मला हे समाधान मिळतं, मी स्वतःच रिंगणात उतरलो तर मला हे समाधान मिळायचं नाही ! कसं ? '

मला पटलं. हा ' दर्शनी ' खेळाडू नाही, ' खरा ' खेळाडू आहे. तो इतरांना खेळवायचा खरा खेळ खेळतो. म्हणून त्याला स्वतःला अलिप्तच असलं पाहिजे.

¤

' खऱ्या ' खेळाडूंच्या ' खऱ्या ' खेळाविषयी सविस्तर वेगळा विचार एकदा करायला हवा ! □

# धूम्रपानावर भाषाशास्त्रीय उपाय

कि. मो. फडके, एम्. ए., डायरेक्टर, फडके सेंटर, मुंबई

आश्चर्य वाटले ना लेखाचे नाव वाचून? साहजिक आहे. कारण धूम्रपान व भाषा यांचा एकमेकांशी काही विशेष संबंध असेल असे कदाचित तुमच्या कधी स्वप्नातही आले नसेल. त्यामुळे धूम्रपानाच्या सवयीवर भाषाशास्त्रीय उपाय करण्याची कल्पना तुम्हाला जरा अजब वाटली तर त्यात काहीच नवल नाही.

अर्थात, धूम्रपानाची सवय शरीरप्रकृतीला अपायकारक असल्यामुळे त्या अनिष्ट सवयीच्या मगरमिठीतून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी माणसाने कोणत्या युक्त्या योजाव्यात हे विशद करून सांगणारी व्याख्यानें तुम्ही ऐकली असतील किंवा काही लेख व पुस्तकेही तुमच्या वाचनात आली असतील. अशा व्याख्यानांतून, लेखातून किंवा पुस्तकांतून केलेले मार्गदर्शन कोणत्या प्रकारचे असते? सामान्यतः या विषयावरील मार्गदर्शनाची सुरुवात होते ती धूम्रपानामुळे माणसाच्या शरीरप्रकृतीवर कसे अनेक अनिष्ट परिणाम होतात यासंबंधीच्या शास्त्रीय माहितीने. ही सविस्तर माहिती श्रोत्यांच्या किंवा वाचकांच्या मनावर असे बिंबविण्याचा प्रयत्न करते की, सिगारेटच्या प्रत्येक झुरक्याबरोबर माणूस कर्करोग, हृदयाचे रोग किंवा तत्सम इतर रोग यांच्यामार्फत स्वतःला मृत्यूच्या करालदाढेत खेचून नेत असतो आणि या मार्गदर्शनाची समाप्ती होत असते ती सिगारेट ओढण्याची सवय सोडून देण्यासाठी प्रबळ इच्छाशक्तीची किंवा मनोनिग्रहाची आवश्यकता प्रतिपादून नंतर त्या सवयीवर मात करण्यासाठी सांगितलेल्या काही तंत्रामध्ये, एक सिगारेट ओढल्यावर स्वतःला शिक्षा म्हणून भिकाऱ्याला एक रुपया द्यावा या पद्धतीपासून ते थेट मोहनिद्रेपर्यंतच्या अनेक पद्धतींचा अवलंब केलेला आढळून येतो.

परंतु जोसेफ डॅनिश नावाच्या एका अमेरिकी लेखकाने या विषयावर जे मार्गदर्शन केले आहे त्याचे स्वरूप जरा निराळे आहे. धूम्रपानाचे दुष्परिणाम सांगून जोसेफ डॅनिश वाचकाच्या मनात घबराट निर्माण करीत नाहीत किंवा वाचकाची सुप्त इच्छाशक्ती प्रज्वलित करून त्याला धूम्रपानाच्या सवयीचा निग्रहपूर्वक बीमोड करण्यासही ते सांगत नाहीत. कारण त्यांच्या मते याबाबतचा निर्णय वाचकाने स्वतःच करावयाचा असतो. इतकेच नाही तर आपल्या पुस्तकाच्या अखेर दिलेल्या संदर्भग्रंथांच्या यादीत धूम्रपानाचे दुष्परिणाम सागणाऱ्या ग्रंथांचा ते जसा उल्लेख करतात तसाच धूम्रपानामुळे मिळणाऱ्या ब्रह्मानंदाची तरफदारी करणाऱ्या ग्रंथाचाही उल्लेख करावयास ते विसरत नाहीत. ते कोणत्याच प्रकारची आग्रही भूमिका घेत नाहीत. उलट त्यांच्या मते माणूस फार निग्रहाने इच्छाशक्ती का काय म्हणतात ती एकवटून किंवा कोणाची शपथ वगैरे घेऊन आपल्या धूम्रपानाच्या सवयीवर तुटून पडण्याचा प्रयत्न करतो म्हणूनच अंगीकारलेल्या या कामात तो बहुधा अयशस्वी होतो! त्यांची ही अनाग्रही भूमिका व्यक्त करण्यासाठीच त्यांनी आपल्या पुस्तकाला नाव दिले आहे Stop without Quitting. या लहानशा परंतु अतिशय मनोरंजक पुस्तकाची केवळ तोंडओळख करून देण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात केला आहे.

### भाषा–वरदान की शाप?

कल्पना करा की, एखादा बेडूक सिगारेट ओढावयास शिकला आहे. कालांतराने तो बेडूक आपली सिगारेट ओढण्याची सवय सोडून देण्याचे ठरवील तर त्याच्या या निर्णयात कुठे भाषा किंवा शब्द यांचा अंतर्भाव असण्याचा प्रश्नच नसतो आणि वर्तमानपत्रे, नियतकालिके, आकाशवाणी, दूरदर्शन यांसारख्या भाषेवर आधारलेल्या जाहिरातींचा त्याच्यावर काहीच परिणाम होऊ शकणार नाही.

माणसाची गोष्ट मात्र फार निराळी आहे. तो बोलू शकतो, वाचू शकतो. भाषा निर्माण करण्याचे व तिचा उपयोग करण्याचे त्याचे सामर्थ्य इतर प्राण्यांना लाभलेले नाही. तेव्हा बेडूक किंवा इतर प्राणी राहतात त्याच भौतिक जगात माणूस राहत असला तरी त्याच्या सभोवताली जे भाषिक विश्व असते तसे ते इतर प्राण्याच्या भोवती नसते. माणसाला मिळालेल्या या नैसर्गिक देणगीमुळे तो त्याच्या जीवनात जी प्रगती करू शकला आहे, जो आनंद निर्माण करू शकला आहे, त्याकडे पाहिले की साहजिकच वाटते की, भाषा म्हणजे माणसाला मिळालेले एक फार मोठे वरदान आहे; परंतु भाषेमध्ये अंगभूत असलेल्या मर्यादांमुळे माणसाची पदोपदी होत असलेली फसवणूक व त्याच्या मनात फोफावणारे गैरसमज पाहिले की वाटते, भाषा हा त्याला मिळालेला मोठा शाप तर नाही ना?

भाषेच्या माध्यमातून आपल्याला सभोवतालच्या निसर्गाचे ज्ञान मिळते ते अगदी सभोवतालच्या वस्तुस्थितिबरहुकूम असते, असा आपण आपला समज करून घेतलेला असतो; परंतु हा समज किती भाबडा असतो पाहा. भूत, वर्तमान व भविष्य या तीन काळाविषयी भाषेचा उपयोग करून जेव्हा आपण विचार करीत असतो तेव्हा असे गृहीत धरीत असतो की, या तीन काळाबद्दलच्या आपल्या कल्पना अगदी निसर्गातील वस्तुस्थितीवर आधारलेल्या आहेत. म्हणजे आपली भाषा नेहमी अचूकपणे बाह्य जगातील वस्तुस्थिती यथार्थपणे प्रतिबिंबित करीत असते, अशी आपली धारणा असते. त्यामुळे एखाद्या भाषेत भूतकाळच नाही असे कोणी आपल्याला सांगितले तर आपल्याला आश्चर्य वाटेल, नाही का? परंतु अमेरिकेतील अरिझोना राज्याच्या उत्तरेकडे राहणारे होपि–इन्डियन लोक जी भाषा बोलतात त्यात खरोखरच भूतकाळ अशी मुळी काही चीजच नाही, ही वस्तुस्थिती आहे.

या होपि–इन्डियन लोकांच्या दृष्टीने काळ हा नेहमी चालूच

असतो. साहजिकच तुमच्या मनात असा प्रश्न निर्माण होईल की, सहा वर्षांपूर्वी एखाद्याने बंदुकीतून गोळी झाडली होती, अशी खरो-खरच भूतकाळात घडलेली घटना हे बेटे होपि–इन्डियन लोक व्यक्त तरी कशी करीत असतील ? आणि या प्रश्नातून इतकेच प्रत्ययास येते की, तुम्ही–आम्ही वापरतो त्या भाषेमुळे आपली अशी ठाम समजूत झालेली आहे की, आपली काळ याविषयीची कल्पना म्हणजे जगातील वस्तुस्थितीचे हुबेहुब प्रतिबिंब आहे. त्यामुळे काळ या-संबंधीची आपली कल्पना आपण भाषेच्या घाटणीमुळे स्वीकारलेली आहे असे कोणी म्हटले तर आपण चक्रावून जाऊ ! परंतु अशा किती तरी कल्पना आपण नकळत स्वीकारलेल्या असतात, हे इतर भाषांच्या अभ्यासामुळे सहज लक्षात येऊ शकते.

तुम्हाला वाटेल की, होपि–भाषा कदाचित फार प्राथमिक पातळी-वर असल्यामुळे त्या भाषेत भूतकाळ असा काही प्रकार नसेल; परंतु तसे म्हणणे योग्य होणार नाही. कारण भाषाशास्त्रज्ञाच्या मते होपि–भाषा ही एक चांगली विकसित भाषा आहे. शिवाय इतर अनेक भाषांमधून व्यक्त होणाऱ्या कल्पना तुमच्या–आमच्या कल्पनांहून किती भिन्न असतात हे पाहिले तर आपल्याला अनपेक्षित धक्के बसतात. रोमन व चिनी भाषेत होय व नाही या शब्दांना प्रतिशब्दच नाहीत, हे समजल्यावर तुम्हाला धक्का नाही बसणार तर काय होईल ? पोर्तुगीज भाषेत आठवड्यातील दिवसांना सोमवार, मंगळ-वार, बुधवार अशी नावे नाहीत; आहेत ते फक्त क्रमांक ! जर्मन भाषेत बुधवार असा काही प्रकारच नाही; त्या भाषेत बुधवार म्हणजे आठवड्यातील मधला दिवस ! इतर काही भाषांमध्ये का व कारण याना काही प्रतिशब्दच नाहीत. ही झाली अगदी थोडी उदाहरणे. या जगाच्या पाठीवर सुमारे २,७०० निरनिराळ्या भाषा बोलणारे लोक आहेत. तेव्हा विश्वाबद्दलच्या सर्व लोकांच्या कल्पना सारख्या असणे कितपत शक्य आहे याची तुम्हाला सहज कल्पना करता येईल आणि ही वस्तुस्थिती विचारात घेऊनच एक भाषा–शास्त्रज्ञ म्हणतो की, माणूस ज्या दृष्टिकोणातून जगाकडे पाहतो, जगाचा अनुभव घेतो व त्याच्या भोवताली घडणाऱ्या घटनांचा अर्थ लावतो तो दृष्टिकोण काही अंशी माणसाच्या भाषिक सवयींमुळे घडलेला असतो.

केवळ भाषिक सवयींमुळे घडविला जाणारा दृष्टिकोण कधीकधी विज्ञानाच्या प्रगतीतही कशा अडचणी निर्माण करू शकतो, याचे एक उत्तम उदाहरण म्हणून पदार्थविज्ञानातील उष्णता या विषयावरील संशोधनाकडे बोट दाखविता येईल. माणसाला उष्णता या नामाचा रोजच्या जीवनात उपयोग करण्याची अशी काही भाषिक सवय झालेली आहे की, त्यामुळे उष्णता ही जशी काही एखादी वस्तू आहे असे वाटू लागते. त्यामुळे शेकडो वर्षे वैज्ञानिकही उष्णता नावाचा पदार्थ शोधून काढण्याची खटपट करीत राहिले आणि आजही आपल्या हाडीमाशी खेळलेल्या भाषिक सवयींमुळे आपण 'तपमान चढले आहे' असे बिनदिक्कत म्हणतो.

माणसाच्या धूम्रपानाच्या सवयीसकट सर्व सवयींत भाषेने त्याच्या-वर लादलेल्या सवयी अगदी बेमालूमपणे गुंतलेल्या असतात आणि माणसाला त्याच्या जीवनातील या गुंतागुंतीची नीट जाणीव नसल्या-मुळे तो केवळ मनोनिग्रह करून, इच्छाशक्तीच्या बळावर त्याची धूम्रपानासारखी एखादी सवय सोडून देण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा कधीकधी त्याची स्थिती अगदी केविलवाणी होते. मात्र या बाबतीत बेडूक बिचारा सुखी प्राणी आहे असे म्हटले पाहिजे. कारण सभोव-तालच्या जगाशी सामावून घेताना त्याच्या मनात निदान भाषिक सवयींमुळे काही गोंधळ होण्याची शक्यता नसते !

### शब्द–तारक की मारक ?

माणूस वापरतो त्या भाषेच्या केवळ विशिष्ट घाटणीमुळे जशी अनेकदा फसगत होत असते तशीच भाषेतील शब्दांमुळेही त्याची कित्येकदा दिशाभूल होत असते. वस्तुतः शब्द म्हणजे प्रतिके असतात. वाघ, घोडा, गुलाम इत्यादी शब्द म्हणजे बाह्य जगातील काही गोष्टी निर्दिष्ट करणारी, माणसाने शोधून काढलेली चिन्हे आहेत. अशा शब्दरूपी चिन्हांतून माणूस त्याच्या सभोवतालच्या जगातील इतर माणसे, वस्तू, प्राणी, कृती, घटना, प्रक्रिया-संबंध इत्यादी गोष्टींप्रमाणेच आपले विचार, भावना इत्यादी गोष्टीही निर्दिष्ट करू शकतो. शिवाय, आपल्या मनातील नेमका अर्थ व्यक्त करण्यासाठी बोलताना व लिहिताना तो काही युक्त्याही योजत असतो. उदाहरणार्थ, शब्दोच्चाराबरोबरच तो आपल्या मनातील अर्थ व्यक्त करण्यासाठी डोळे व भिवया यांची हालचाल करतो किंवा शब्दावर जोर देऊन इतरही कित्येक हावभाव करतो. तसेच, लिहिताना तो काही शब्द मोठ्या किंवा तिरप्या अक्षरात लिहितो, तर काही शब्द अवतरणचिन्हांत लिहितो अथवा काही शब्द अधोरेखित करून लिहितो. अशा प्रकारे माणूस शब्दांना आपल्या हुकमतीत ठेवून रोजच्या व्यवहारात त्यांच्याकडून आपली कामे यशस्वीपणे करवून घेतो, हे खरे आहे.

परंतु शब्द फार फसवेही असतात. कारण आपण कितीही काळजी घेतली तरी आपले शब्द इतरांना काही वेगळाच अर्थ सूचित करतात. समजा, तुम्ही गुलाब हा शब्द उच्चारलात तर दुसऱ्या व्यक्तीला निदान या साध्या शब्दाचा अर्थ समजण्यास काही अडचण भासण्याचे कारण नाही असे तुम्हाला वाटणे स्वाभाविकच आहे आणि दुसऱ्या व्यक्तीला गुलाब या शब्दाचा काही अर्थ कळेलही; परंतु दुसऱ्या व्यक्तीला त्या शब्दामुळे कोणता अर्थ समजेल हे मात्र ती व्यक्ती कोण आहे त्यावरही अवलंबून आहे. कारण एखाद्या बागेतील प्रेमिकाला व माळ्याला किंवा आपापल्या प्रयोगशाळेत काम करणाऱ्या वनस्पति-शास्त्रज्ञाला व माणसाच्या मज्जासंस्थेचा अभ्यास करणाऱ्या संशोध-काला गुलाब. या शब्दामुळे नेमका तुमच्याच मनातील अर्थ सूचित होईल असे कोणी सांगावे ?

तुम्हाला वाटेल की, असा अर्थाचा अनर्थ होऊ नये म्हणून शब्दाचा उपयोग करताना नेहमी शब्दकोश जवळ ठेवलेला बरा. कदाचित या पद्धतीने तुमचे काम काही अंशी सुलभ होईल; परंतु एक लक्षात ठेवा की, अखेर शब्दकोशात एखाद्या शब्दाचा अर्थ आणखी दुसरे शब्द देऊन सांगितलेला असतो आणि त्या दुसऱ्या शब्दांचे अर्थ तुम्ही शब्दकोशात शोधावयाचा प्रयत्न कराल तर आणखी काही शब्द तुम्हाला समज-तील इतकेच ! परंतु एखाद्या शब्दामुळे जे नाना तऱ्हेचे अर्थ सूचित होतात ते सर्व अर्थ काही तुम्हाला एखाद्या शब्दकोशात सापडणार नाहीत.

आता धूम्रमान हाच शब्द पाहा. समजा तुम्ही या शब्दाचा अर्थ एखाद्या शब्दकोशात पाहिलात तर? तर तुम्हाला या शब्दाचे फारच थोडे व वरवरचे अर्थ समजतील. कारण शब्दकोशात माणसाच्या शब्द वापरण्याच्या प्रचलित किंवा रूढ सवयीची नोंद करण्याचा जरी कसोशीने प्रयत्न केलेला असतो तरी शब्दांच्या सर्वच अनुच्चारित अर्थांची नोंद शब्दकोशात करणे शक्य नसते. कारण शब्दकोश तयार करावयाचा म्हटला की, संकलन व संपादन ही कामे ओघानेच आली आणि संपादन म्हटले की, काही अर्थांची निवड व काहींची काटछाट ही कामेही अटळ असतात. त्यामुळे शब्दकोशात जरी शब्दांचे काही रूढ व प्रचलित अर्थ दिलेले सापडतात तरी त्या शब्दाचे अनुच्चारित लागेबांधे व दूरचे नातलग अनुल्लेखाने मारलेलेच असतात. म्हणूनच धूम्रपान या शब्दाचे अर्थ म्हणून तुम्हाला एखाद्या शब्दकोशात राख, रोगण, उष्णता, ज्वलनातून निर्माण होणारी सुमारे ३,००० रासायनिक द्रव्ये, धूम्रपान करणाऱ्या माणसाचे हृदय, फुप्फुसे, श्वासनलिका, त्या नलिकेतील आतल्या पृष्ठभागावरील केशतंतू, रक्तवाहिन्या, तसेच त्या माणसाची धूम्रपानाची सवय टिकविण्यासाठी अमाप पैसा खर्च करून अनेक प्रचारतंत्राचा उपयोग करणारा तंबाखूचा उद्योग व व्यापार, शिवाय त्या माणसाचे जीवन, स्वप्ने, संभाव्य मृत्यू इत्यादी गोष्टींची नोंद केलेली आढळणार नाही. कारण संकलनाचे व संपादनाचे आपले काम चोखपणे करून कोशकार नेहमी शब्दांचे प्रचलित व रूढ अर्थ नमूद करून ठेवीत असतात.

शब्दांचे निवडक अर्थ देण्याच्या या पद्धतीमुळे शब्दकोश एक प्रकारे आपल्यावर वस्तुस्थितीचे सदोष मूल्यमापन लादत असतो. म्हणजे असे की, धूम्रपानाचे रूढ, प्रचलित व अपायकारक परिणाम व्यक्त न करणारे बिनधोक अर्थ सांगून हानिकारक परिणाम व्यक्त करणारे अर्थ वगळून शब्दकोश आपली दिशाभूलच करतो. त्यामुळे असे म्हणता येईल की, शब्दकोश हा जसा शब्दांचे व वाक्प्रचाराचे प्रचलित अर्थ सांगणारा प्रमाणभूत ग्रंथ असतो तसाच तो प्रचलित मूल्यमापनाच्या प्रथा अधिक बळकट करणारा ग्रंथही असतो. याचा अर्थ असा की, शब्दकोशात तुम्हाला चालीरीतींचे, प्रथांचे, वहिवाटीचे किंवा सवयीचे प्रतिबिंब पहावयास मिळते हे खरे असले तरी त्यात तुम्हाला सर्व वस्तुस्थितीचे प्रतिबिंब पाहवयास मिळते असे नाही आणि शब्दकोशामुळे आपल्या मनावर नकळतपणे वस्तुस्थितीसंबंधीचे जे सदोष मूल्यमापन ठसविले जाते त्यामुळे आपण एका भाषिक विकृतीने पछाडले जातो. या विकृतीने पछाडलेल्या माणसाचे ढोबळ लक्षण म्हणजे असा माणूस शब्दांचे किंवा वाक्प्रचाराचे अनुच्चारित, खोल किंवा गर्भित अर्थ समजावून घेण्यास असमर्थ असतो. आपल्या या भाषिक विकृतीवर उपाय म्हणजे,आपण जे शब्द वापरतो त्यातून उघडपणे किंवा सुप्तपणे डोकावणारे सर्व अर्थ समजावून घेऊन ते अर्थ जी वस्तुस्थिती व्यक्त करतात त्या वस्तुस्थितीचा अनुभव घेणे किंवा वेगळ्या प्रकारे सांगावयाचे म्हणजे, शब्दकोशामुळे आपण वस्तुस्थितीला शब्दाची दासी केलेली असेल तर जागरूक राहून शब्दांना परत वस्तुस्थितीचे दास बनविले पाहिजे.

धूम्रपान या प्रक्रियेबद्दलचा सामान्यतः तुमचा काय समज असतो? बहुधा असे म्हणता येईल की, तुम्हाला अभिप्रेत असलेला अर्थ म्हणजे सिगारेट पेटविणे, धूर तोंडात घेणे, तो थेट श्वासनलिकेतून फुप्फुसांत ओढणे आणि अखेर तो धूर उच्छ्वासाबरोबर परत बाहेर फेकून देणे; परंतु धूम्रपानाचा हा अर्थ फारच मर्यादित स्वरूपाचा आहे, नाही का? धूम्रपान या शब्दाचे लागेबांधे किती दूरवर पसरलेले आहेत ते आपण वरती पाहिलेच आहे. अर्थात धूम्रपान या शब्दाचे सर्व जवळचे व दूरचे नातेवाईक विचारात घेतले तर तो शब्द शब्दकोशातील धूम्रपान या शब्दाहून निराळा आहे हे स्पष्ट करण्यासाठी आपण एक नवी प्रथा पाडू या. ती प्रथा म्हणजे आपण वापरीत आहोत तो धूम्रपान हा शब्द केवळ धूम्रपान या शब्दकोशातील शब्दाप्रमाणे मर्यादित अर्थाचा नाही हे व्यक्त करण्यासाठी आपण तो शब्द थोड्या तिरक्या अक्षरांत व अवतरणचिन्हांमध्ये लिहिण्याची सवय करू या. म्हणजे धूम्रपान या शब्दकोशातील शब्दाचा नव्हे तर '*धूम्रपान*' या शब्दाचा अर्थ काय होईल याचा तुम्ही विचार करू लागलात तर या शब्दातून निघणाऱ्या गर्भित अर्थांची मालिका मारुतीच्या शेपटीप्रमाणे वाढतच जाईल; परंतु त्यासाठी तुम्ही एक साधे तंत्र आत्मसात करणे उपयुक्त ठरेल. ते तंत्र म्हणजे, तुम्ही अशी कल्पना करावयाची की, तुम्ही कधी कोणती भाषा शिकलाच नव्हतात व त्यामुळे आज तुम्हाला कोणतीही भाषा येत नाही आणि तुम्हाला भाषाच येत नसली तरी या जगातील वस्तुस्थिती व घटना याचा तुमच्या इंद्रियांद्वारे तुम्ही अनुभव घेऊ शकत असल्यामुळे केवळ तुमच्या अनुभवावर आधारलेले कोणते अर्थ 'धूम्रपान' या शब्दापुढे तुम्हाला नमूद करता येतील पहा :

आग, ज्वलन, अनेक वायू, रोगण, राख, सुमारे तीन हजार रसायने, सिगरेट ओढणारी व्यक्ती, त्या व्यक्तीच्या हृदयाची स्पंदने, त्या व्यक्तीमधील ६६,००० मैल लांब पसरू शकतील एवढ्या रक्तवाहिन्या, त्या व्यक्तीची स्वप्ने, मनोराज्ये, तसेच त्या व्यक्तीच्या आल्हाददायक संवेदना इत्यादी.

## भ्रमाचे भोपळे

आणखी किती तरी गोष्टींभोवती हे मारुतीचे शेपूट वळसे घालून जाऊ शकेल आणि '*धूम्रपान*' या क्रियेचा अर्थ म्हणून वर दिलेला किंवा देता येण्यासारखा प्रत्येक शब्द तिरक्या अक्षरात व अवतरणचिन्हांमध्ये लिहून तुम्ही जर त्या प्रत्येक शब्दाचे अर्थ शोधू लागलात तर ही मारुतीची शेपटी कोठपर्यंत पोचेल कोणी सांगावे! तुम्हाला भाषाच येत नाही असे समजून शब्दाचे गर्भित अर्थ शोधण्याची तुम्ही एकदा स्वतःला सवय लावून घेतलीत की, मग वस्तुस्थितीकडून शब्दाकडे जाण्याचा राजमार्ग तुम्हाला मोकळा होईल. उलट, तुमच्या दैनंदिन जीवनात तुम्ही काय करीत असता? दैनंदिन जीवनात तुम्ही आपले सारखे शब्दाकडून वस्तुस्थितीकडे जात असता; परंतु तुमच्या या नव्या सवयीमुळे तुम्ही आता भाषेच्या व शब्दांच्या मागे लपलेल्या वस्तुस्थितीच्या, घटनांच्या व संबंधांच्या एका विशाल जगाचा अनुभव घेण्यास शिकू शकाल.

तुम्ही वापरता त्या भाषेच्या व शब्दांच्या पलीकडे जाऊन वस्तुस्थितीची जाणीव वाढविणे हे काम काही सोपे नाही. कारण माणसाला धूम्रपानाची चटक लागावी म्हणून तंबाखूचे व्यापारी अनेक प्रचारतंत्रांचा वापर करून त्याच्या डोळ्यांपुढे एक जादूनगरी उभी करण्यात व्यग्र असतात. ही जादूची नगरी मोठी मोहक व रंगीबेरंगी

असते. शिवाय, जाहिरातदारांनी या जादूनगरीची उभारणी असे काही मुलायम शब्द वापरून केलेली असते की, माणूस कोणत्या ना कोणत्या आभासाच्या मागे धावत सुटावा. कोणाला वाटते की, धूम्रपान करून त्याला आपल्या एकलेपणाची आग विझविता येईल, तर कोणाला वाटते की, पेटलेली सिगरेट ऐटीत तोंडात धरून तो चित्रपटसृष्टीतील एखाद्या नायकाप्रमाणे चमकू लागेल ! कोणी आपल्या व्यक्तिमत्त्वातील पौरुषत्वाला उठाव आणण्यासाठी सिगारेट ओढू लागतो, तर कोणी वडीलधाऱ्या माणसांनी लादलेली बंधने आपण झुगारून दिली असल्याची ग्वाही म्हणून सिगारेटचा आश्रय घेतो. काही म्हातारे लोक तरुण दिसण्यासाठी सिगारेटचा शौक नव्यानेच करू लागतात, तर काही तरुण–तरुणी प्रौढ दिसण्यासाठी सिगारेटची मदत घेतात आणि केवळ इतराची मर्जी संपादन करण्यासाठी किंवा इतराची खप्पा मर्जी टाळण्यासाठी धूम्रपानाची सवय खटपटीने स्वतःला लावून घेणारी माणसेही काही कमी नसतात !

## प्रतिबंधक जादूटोणा

आश्चर्याची गोष्ट अशी की, धूम्रपानामुळे पदरी पडणारे फायदे म्हणजे केवळ भ्रमाचे भोपळे असतात. कारण वस्तुतः धूम्रपानामुळे माणसाला मिळणारे समाधान फार फसवे किंवा नकली असते. माणसाची क्षुधा, तृष्णा, कामवासना, निद्रा किंवा सर्जनशील कृती करण्याची ऊर्मी या प्रेरणांच्या पूर्तीमुळे त्याला खरोखरच काही समाधान मिळते; परंतु धूम्रपानामुळे त्याला कोणते खरे समाधान मिळते ? माणूस धूम्रपान करून काही खरोखरीच चित्रपटातील लोकप्रिय नायक होत नाही किंवा तो तरूण असेल तर सिगारेट ओढून प्रौढ होत नाही; त्याचप्रमाणे तो म्हातारा असेल तर सिगारेट त्याला तरुण करीत नाही. बरे, सिगारेट ओढून त्याच्या शरीरात काही जीवनसत्त्वांची अथवा प्रथिनांची भर पडते असेही नाही; परंतु धूम्रपान करून आपल्या काही आकांक्षा फलद्रूप होत आहेत अशी त्याची एक भ्रामक समजूत असते आणि माणसाच्या मनात अनेक आकांक्षा निर्माण करून त्या आकांक्षांची परिपूर्ती करण्याचा सोपा मार्ग म्हणजे धूम्रपान करणे ही गोष्ट त्याच्या मनावर ठसविण्याचे काम तंबाखूचे व्यापारी, वर्तमानपत्रे, नियतकालिके, आकाशवाणी, दूरदर्शन इत्यादी अनेक माध्यमांचा उपयोग करून अतिशय कौशल्याने करीत असतात. याचा परिणाम असा होतो की, भाषिक विकृतीने पछाडलेला माणूस शब्दांचे किंवा वाक्प्रचारांचे गर्भित परंतु अनुच्चारित अर्थ समजावून घेण्यास असमर्थ असल्यामुळे त्याला जाहिरातीनी उभी केलेली जादूनगरी म्हणजे एक भ्रम आहे, हे ओळखता येत नाही.

भाषाच येत नसल्यामुळे बेडूक हा प्राणी या बाबतीत किती नशीबवान आहे हे तुम्हाला आता तरी पटले ना ? सामाजिक यशाचे किंवा अपयशाचे, शौर्यत्वाचे किंवा पुरुषत्वाचे भ्रामक समज शब्दामार्फत कधीही त्याच्या गळी उतरविता येणार नाहीत. तेव्हा तुम्हाला धूम्रपानाची सवय सोडून द्यावयाची इच्छा असेल तर एका अर्थाने तुम्हाला बेडकाची पातळी गाठली पाहिजे ! कारण आज धूम्रपान या प्रक्रियेबद्दलचे तुमचे ज्ञान तुमच्या भाषिक विकृतीमुळे फारच एकांगी झालेले आहे. तंबाखूच्या व्यापाऱ्यांनी प्रचारतंत्राचा कौशल्याने उपयोग करून तुमच्यावर जणू काही एक जादूटोणाच केलेला आहे. त्या जादूटोण्याचा परिणाम ---- झाला आहे की, धूम्रपानाच्या वस्तुस्थितीसंबंधी तुम्ही अज्ञानात वावरत आहात अर्थात तंबाखूच्या व्यापाऱ्यांना शिव्याशाप देऊन काहीच फायदा होणार नाही; परंतु तंबाखूच्या व्यापाऱ्यांनी तुमच्यावर जो जादूटोणा केला आहे त्यावर काही प्रतिजादूटोणा केल्याशिवाय तुमचे धूम्रपानाच्या वस्तुस्थितीबद्दलचे ज्ञान सर्वांगीण होणार नाही.

प्रतिबंधक जादूटोणा स्वतःवर करण्यासाठी पुढे जी तंत्रे सांगितली आहेत या तंत्राचा एक उद्देश म्हणजे तुम्हाला बेडकाच्या पातळीवर जाऊन *'धूम्रपान'* या प्रक्रियेचा अनुभव घेण्यास शिकविणे. कारण आजमितीस तुमची *'धूम्रपान'* करण्याची सवय व तुमचे *'धूम्रपान'* याविषयीचे ज्ञान याच्यामधील झगडा हा काही तुल्यबळ प्रतिस्पर्ध्यांमधील झगडा आहे, असे म्हणता येणार नाही. तुमची सवय तुमच्या रोमरोमात भिनलेली आहे, तर *'धूम्रपान'* याविषयीचे तुमचे ज्ञान आताच विस्तारित होऊ लागले आहे. तेव्हा तुमच्या जुन्या सवयीविरुद्ध उभ्या ठाकलेल्या या प्रतिस्पर्ध्याला प्रथम खाऊ-पिऊ घालून धष्टपुष्ट करावयास हवे. एकदा हा प्रतिस्पर्धी तुल्यबळ होऊन रिंगणात उतरला की तुमचे काम संपले ! तेव्हा या प्रतिस्पर्ध्याला बलवान करण्यासाठी खालील जंतर-मंतर तंत्राचा उपयोग करा; परंतु ती तंत्रे म्हणजे धूम्रपानाची सवय सोडून देण्यासाठी योजिलेली पद्धत आहे असे समजूच नका ! तुम्ही असे समजा की, खालील तंत्रे म्हणजे फक्त भाषाशास्त्रातील काही मनोरंजक वस्तुपाठ आहेत !

(१) तुम्ही स्वतःला सर्वत्र अवतरणचिन्हे पाहण्यात व ऐकण्यात रममाण होण्यास शिकवा. त्यासाठी सतत अवतरणचिन्हांचा विचार करा, ती कागदावर काढा व स्वप्नात पाहा ! मुख्य म्हणजे जेथे अवतरणचिन्हे नसतील तेथे ती पाहण्यास व ऐकण्यास शिका. तुम्ही स्वतः धूम्रपान कराल तेव्हा किंवा इतर लोक धूम्रपान करीत असतील तेव्हा तुमचे किंवा इतर लोकांचे *'सिगरेट'* काढून ती *'शिलगावून'* नंतर *'झुरके'* घेण्याचे काम चालू आहे हे डोळयांनी पाहण्यास शिका ! आकाशवाणीवरून एखादी जाहिरात ऐकतानासुद्धा *'सिगरेट'* *'आरामदायक'* असते व ती ओढून तुम्ही अधिक *'रुबाबदार'* दिसता, असे अवतरणचिन्हात व तिरक्या अक्षरांत लिहिलेले शब्द नजरेसमोर आणून ती जाहिरात ऐकावयास सुरुवात करा ! घाई किंवा गडबड करण्याचे काहीच कारण नाही. सावकाश परंतु न विसरता *'धूम्रपान'* या प्रक्रियेशी निगडित असलेल्या सर्व वस्तू व घटना अवतरणचिन्हात पाहण्यास शिका !

(२) *'धूम्रपान'* या सवयीशी संबधित असलेल्या सर्व वस्तू व घटना अवतरणचिन्हात पाहण्याचे काम तुम्ही केवळ बुद्धीने करून भागणार नाही. त्या कामात तुमचे सर्व शारीरिक व मानसिक व्यक्तिमत्त्व गुंतणे हितकारक आहे, म्हणून तुम्ही तुमच्या हाताच्या बोटांनी काही खुणा करून अवतरणचिन्हे व्यक्त करावयास शिका ! उदाहरणार्थ, तुमचा अंगठा व तर्जनी ही बोटे वाकवून अशा रीतीने ती बोटे तुम्ही तुमच्या डोळ्यांसमोर धरा की, ज्यामुळे ती बोटे अवतरणचिन्हांचा अर्थ व्यक्त करतील. तुम्ही हे तंत्र शिकलात की, त्यामुळे तुमच्या सर्व व्यक्तिमत्त्वावर *'धूम्रपान'* करण्याच्या तुमच्या सवयीशी संबंधित असलेल्या सर्व वस्तूंचे व घटनांचे सर्व गर्भित अर्थ ठरविले जातील आणि या नव्या तंत्रामुळे तुमचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व शब्दांचे अगदी दूरवचे लागेबांधे व गर्भित अर्थ अनुभवण्यास समर्थ होईल. त्यामुळे प्रचारमाध्यमातून तुमच्यावर जे शब्द सतत वर्षाव करीत असतात त्यांची आज्ञा गुलामाप्रमाणे न मानता तुम्ही उलट त्या शब्दांशी मुकाबला करावयास सज्ज व्हाल !

(३) एखादा माणूस *'धूम्रपान'* करताना दिसला की, तुमच्या बोटांनी अवतरणचिन्हांची खूण करून समोर दिसत असलेल्या क्रियेत अदृश्य असलेल्या सर्व गर्भित अर्थांचे तुमचे भान वाढविण्याचा प्रयत्न करा. जितक्या अधिक वेळा तुम्ही बोटांच्या मदतीने अवतरणचिन्हांची खूण कराल तितके चांगले. तुमच्या सर्व व्यक्तिमत्त्वाला ही हावभावांची भाषा चांगली कळते हे लक्षात ठेवा.

(४) *'धूम्रपान'* या सवयीचे रोज नवे लागेबांधे व गर्भित अर्थ शोधून काढण्याचा प्रयत्न करीत राहा आणि शोधून काढलेल्या परंतु वरवर पाहता शब्दात न दिसणाऱ्या गर्भित अर्थांची काही वर्गवारी करण्यास शिका! उदाहरणार्थ, गर्भित अर्थांच्या पहिल्या वर्गाला शारीरिक गट असे नाव देऊन त्यामध्ये तुम्हाला हृदय, घ्राणेंद्रिय, श्वासनलिका, त्या नलिकेतील आतील पृष्ठभागावर असलेले केशतंतू, फुप्फुसे, रक्तवाहिन्या इत्यादींचा समावेश करता येईल. तसेच दुसऱ्या वर्गाला रासायनिक गट असे नाव देऊन त्यामध्ये तुम्हाला निकोटीन, रोगण, राख, शेकडो वायू, वायुरुप द्रव्ये इत्यादींचा समावेश करता येईल. एकदा असे गट तयार केलेत की ते गटही तुम्हाला 'गट पहिला' किंवा 'गट दुसरा' अशा खास कोंदणात घालून पाहता येतील.

(५) वरील तंत्रांचा अवलंब करण्याचे तुमचे काम चालू असताना तुम्ही जरा थांबा व केलेल्या कामाकडे नजर टाकून पाहा म्हणजे तुमच्या लक्षात येईल की, अवतरणचिन्हे पाहण्याची, बोटे वाकवून अवतरणचिन्हांची खूण करण्याची व *'धूम्रपान'* करण्याच्या सवयीशी संबंधित असलेल्या शब्दांमध्ये गर्भित अर्थ शोधण्याची संधी किती तरी वेळा तुमच्याकडे चालून आली होती तरी तुम्ही तिचा उपयोग केला नव्हतात. हरकत नाही. परंतु यामुळे तुमच्या परत एकदा असे पक्के लक्षात येईल की, प्रचारमाध्यमातील शब्दांनी तुमच्याभोवती कसा सतत गराडा घातलेला असतो आणि *'धूम्रपान'* करण्याशी संबंधित असलेल्या सर्व गोष्टीत नवे नवे गर्भित अर्थ शोधण्याची संधी तुम्हाला सर्वत्र दिसू लागेल.

(६) सिगारेट ओढणे या क्रियेकडे 'ओढणारा' व 'तंबाखू' यांच्यातील संबंध म्हणून पाहण्यास शिका आणि हा 'संबंध' काळजीपूर्वक पाहण्याचा प्रयत्न करा!

(७) जाहिरातीकडे 'जाहिराती' म्हणून पाहा, म्हणजे तंबाखूचा उद्योग व व्यापार यांच्याशी निगडीत असलेले अर्थ त्या 'जाहिरातीत' ओतण्याची कोशीस करा!

हे काम तुम्हाला निरनिराळ्या पद्धतींनी करता येईल. उदाहरणार्थ तुम्ही तुमच्या सिगारेटवर 'भाडोत्री प्रचार' असे शब्द लिहा किंवा सिगारेटच्या पाकिटावरील मोहक चित्रात द्या काही टाचण्या भोसकून! किंवा अशी कल्पना करा की, तुम्ही कोणी तरी फार मोठे प्रसिद्ध क्रिकेटपटू आहात व एखाद्या जाहिरातीच्या कंपनीकडून खूप पैसे घेऊन कोणत्या तरी विशिष्ट सिगारेटला तुम्ही एक सुरेख प्रशस्तिपत्र देत आहात. कल्पनेच्या साम्राज्यात हा खेळ खेळताना हातांची बोटे वाकवून ते सर्व प्रशस्तिपत्र अवतरणचिन्हांच्या कोंदणात पाहण्यास विसरू नका.

(८) *'धूम्रपान'* करण्यामुळे खरोखरच काही दुष्परिणाम होतात असे तुम्हाला वाटत असेल तर स्वस्थ बसू नका. ते सर्व दुष्परिणाम कागदावर लिहून काढा. *'धूम्रपान'* करून कर्करोग होईल असे तुम्हाला वाटत असेल तर 'सिगारेट' या वस्तूच्या अर्थांचे जाळे दूरवर व सर्वत्र पसरवून टाका. त्यात तुमचे आजारपण, यातना, खर्च, तुमचा मृत्यू, बायकोचे व मुलांचे प्रश्न, तुमच्या मृत्यूनंतरचे त्यांचे जीवन इत्यादी अनेक गर्भित अर्थांचा समावेश करा. थोड्याच दिवसात शब्दांच्या पलीकडे जाऊन त्यांच्यामधील गर्भित अर्थ शोधून ते तुमच्या सर्व व्यक्तिमत्त्वाला जाणवून देण्याचे हे काम तुम्हाला आवडू लागेल. फारच उत्तम! आता आणखी काही जादूटोणा करावयास शिका.

(९) सिगारेटची थोटके, काड्यांच्या पेट्यांचे तुकडे, काड्या, सिगारेटची पाकिटे व त्यातील चांदी इत्यादी *'धूम्रपान'* या सवयीशी संबंधित असलेल्या वस्तू जमा करुन त्यांची एक झकास माळ तयार करा. या माळेत 'श्वासनलिकेतील केशतंतू', 'खोकला', 'रुपये' असे शब्द लिहिलेले काही कागदांचे तुकडेही घाला. ही माळ तुमच्याजवळ ठेवा.

(१०) *'धूम्रपान'* या विषयावर तुम्हाला जर काही गाणी रचता व म्हणता आली तर फारच छान. शिवाय बेडकाचा आदर्श स्वतःपुढे ठेवण्यासाठी कागदावर बेडकाचे चित्र काढा आणि तुमची गाणी रचताना व म्हणताना अथवा बेडकाचे चित्र कागदावर काढताना तुम्ही विनोदाचा आश्रय घेतलात तर 'धूम्रपान' या शब्दाचे सर्व गर्भित अर्थ तुमच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वात अगदी मोरावळ्यासारखे मुरत राहतील.

वरील सर्व उपायामुळे (किंवा मर्कटचेष्टामुळे!) तुमच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वातील अणुरेणू *'धूम्रपान'* या सवयीसंबंधीच्या खऱ्या वस्तुस्थितीच्या जाणीवेने अगदी ओथंबून येईल. असे झाले की, तुमच्या 'धूम्रपान' करण्याच्या जुन्या सवयी विरुद्ध उभे ठाकलेले तुमचे ज्ञान अधिक सखोल होत जाईल आणि मग या दोन तुल्यबळ प्रतिस्पर्ध्यांमधील सामना एकदम असे काही वळण घेईल की, तुमचे सर्व व्यक्तिमत्त्व खडबडून जागे होईल व तुम्ही 'धूम्रपान' तिथल्या तिथे बंद करून टाकाल.

तुम्हाला साहजिकच असे वाटेल की, अशा प्रकारे एक दिवस अचानक तुम्ही *'धूम्रपान'* करणे सोडून द्याल हे कसे काय शक्य आहे? परंतु हा चमत्कार शक्य आहे. कारण तुम्ही म्हणजे एक मनुष्यप्राणी आहात. त्यामुळे सर्व प्राणीमात्राप्रमाणेच एक सथपणे, संपूर्ण प्राणिमात्र म्हणून आत्महितकारक वर्तन करण्याकडे तुमची ही नैसर्गिक प्रवृत्ती असते. परंतु तुम्हाला जडलेल्या भाषिक विकृतीमुळे व तुमच्यावर सभोवतालच्या प्रचारतंत्रामार्फत होत असलेल्या शाब्दिक हल्ल्यामुळे तुम्ही कधीकधी संपूर्ण प्राणिमात्र म्हणून एकसंघपणे आत्महितकारक वर्तन करण्याच्या तुमच्या नैसर्गिक प्रवृत्तीविरुद्ध जाऊन वर्तन करु लागता. म्हणजे एक प्रकारच्या अज्ञानामुळे 'धूम्रपान' करण्याची विघातक सवय तुम्ही स्वतःला लावून घेतली आहे. परंतु वर सांगितलेल्या तंत्रांचा अवलंब करुन जर तुम्ही स्वतःच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या कणांकणातून 'धूम्रपान' या सवयीचा सर्व सखोल व गर्भित अर्थ एकदा का म्हणता भिनविलात की एक दिवस तुमचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व उसळी मारुन वस्तुस्थितीला सामोरे जाईल व तत्क्षणीच तुम्ही 'धूम्रपान' करणे सोडून द्याल.

असे एखाद्या अचानक क्षणी *'धूम्रपान'* सोडून देण्याची कृती ही एक मोठी सर्जनशील झेप आहे. एखादा शास्त्रज्ञ कोणत्या तरी अवघड प्रश्नाचे उत्तर शोधून काढण्याची खूप खटपट करतो आणि एक दिवस अगदी अकस्मातपणे त्या प्रश्नाचे उत्तर त्याच्या डोळ्यापुढे स्पष्टपणे साकार होते, तसाच हा प्रकार आहे. आपल्या समोरील प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी शास्त्रज्ञ जे काही परिश्रम करीत असतो त्याचा परिणाम अचानकपणे एखाद्या अनपेक्षित क्षणी जाणिवेच्या पातळीवर अवतीर्ण होतो. त्याचप्रमाणे तुम्ही जर वर दिलेले प्रतिबंधक जादूटोणे करीत रहाल तर 'धूम्रपान' करण्यासंबंधीची सर्व वस्तुस्थिती तुमच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाला एक दिवस अशी काही प्रकर्षाने जाणवेल की तुमच्या डोक्यात एकदम लख्ख प्रकाश पडून तुम्हीही एखाद्या शास्त्रज्ञाप्रमाणे मोठी सर्जनशील झेप घेऊन *'धूम्रपान'* करण्याच्या तुमच्या सवयीला तडकाफडकी रामराम ठोकाल! □

# भ्रष्टाचार!....

माझा एक वकील मित्र आहे.

कोर्टाच्या 'वातावरणाला' अजून तो सरावला नाहीये.

त्याच्या कामावरून तो नवखा आहे हे कधी जाणवलं नव्हतं; पण तो अजून कोर्टाचे 'रीति–रिवाज' शिकला नाहीये हे त्या दिवशी माझ्या लक्षात आलं.

कोर्टाच्या आवारातल्या घुबडांचं वास्तव्य असलेल्या टोलेजंग लिंबाच्या वृक्षाखाली आम्ही दोघे उभे होतो–

समोरच्या खिडकीतून कोर्टातल्या कारकुनानं वकीलमित्राला हाक टाकली.

त्याच्याबरोबर मीही 'कारकूनसाहेबां'-च्या टेबलाशी पोचलो– .

'कारकुनसाहेबां'नी त्याच्या एका केसचे पेपर काढले.

काढलेले कागद त्याच्यासमोर टाकत, आपला चष्मा सावरत, तपकीरभरलं नाक रुमालानं पुसत सांगितलं, 'किती चुका यात! 'या तारखा नाहीत, हा मजकूर खोडला नाहीत–इथं सही राहिली तुमची!'

आमचा वकीलमित्र नवखा असला तरी चाणाक्ष आहे.

आपण 'रिवाज' टाळू पहातो आहोत म्हणून या किरकोळ चुकांचं निमित्त करून हा डाफरतोय हे त्याच्या लक्षात आलं–

त्यानं खिशातून रुपयाचा एक ठोकळा काढला. त्याच्या टेबलावर ठेवला. उचलून पटकन् खिशात टाकत 'राहू दे राहू दे' म्हणत त्यानी कागद आवरले.

¤

त्या दिवशी सरकारी कामगार अधिकारी आलेले.

मीही तिथं होतो–

नगरपरिषदेच्या सार्वजनिक वाचनालयाचा नवीन ग्रंथपाल तिथं आलेला. याची नेमणूक झाल्यापासून वाचनालयात व्यवस्थितपणाच्या नावाखाली नको तितकी कर्मठ शिस्त आलेली! रॅकमधे पुस्तकं नंबरप्रमाणं आपापल्या जागेवर जाऊन बसली. पुस्तकाच्या याद्या तयार झाल्या. नंबरं बघून पुस्तक सांगायचं. तेवढंच तुमच्या हातात येईल. चाळायला पुस्तकं मिळेनाशी झाली!

मागितलेलं पुस्तक परत देऊन दुसऱ्याची मागणी केल्यावर तर कपाळावर आठ्या पडायच्या! 'यादी बघून, ठरवून मगच सांगा–' सुनावलं जायचं. वाचनालयातलं निर्भेळ, मोकळं वातावरण कधीच लोपलं–काटेकोर नियमांनी बांधलं गेलं. नियमांचा काटेकोरपणा बोचायला लागला!

तर हा ग्रंथपाल तक्रारअर्ज घेऊन आलेला.

'नगरपरिषदेच्या व्यवस्थापनानं माझी वाचनालयावर आकसानं बदली करून माझ्यावर अन्याय केलेला आहे. सबब माझ्यावरील अन्याय दूर व्हावा!'

तो गेल्यावर मी साहेबांना विचारलं–

साहेब मिष्कील हसले–म्हणाले–

'स्वाभाविक आहे, आकस वाटणारच. पूर्वी 'जकातनाक्यावर' काम करायचा. आता इथं वाचनालयात आणून बसवलंय!'

त्याच्या 'मारून–मुटकून' कामाचं रहस्य तेव्हा माझ्या लक्षात आलं.

¤

माझा एक मनस्वी मित्र आहे–

बँकेत नोकरी करतो, कॅशिअर आहे.

त्याच्या खोलीवर जमलेल्या आमच्यात एकदा वाद पेटला होता.

वादाचा विषय होता–'भ्रष्टाचार!' तेव्हा बँकेतल्या एका शिपायानं सांगितलेला किस्सा त्याला ऐकवला होता–

बँकेतला कॅशिअर आणि शिपायाला रिक्षा-अलौन्स मिळायचा. स्टेट बँकेत कॅश न्यायला, सुरक्षितता म्हणून.

कॅशिअर आणि शिपाई चालत जायचे आणि रिक्षा-अलौन्स दोघात वाटून घ्यायचे!

परवा माझ्या या मित्रानं मी सांगितलेल्या गोष्टीची आठवण दिली–म्हणाला, 'पूर्वी मी असंच करायचो. आपण भ्रष्टाचार करतोय हे जाणवलंही नव्हतं, इतकी ही सवय अंगवळणी पडलेली होती!

'तू लक्षात आणून दिलंस तेव्हा ठरवलं रिक्षानं गेलो तरच अलौन्स घ्यायचा, नाही तर नाही! त्यामुळं इतरांची गोची झालीये –पण मला काय त्याचं? मी माझ्या पुरतं ठरवलंय!'

मला फार बरं वाटलं– घातलेला वाद निरर्थक गेला नाही म्हणून –

–विनय गुणे

**दलित-दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**
**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

–रा. ग. जाधव
(केसरी, रविवार, ६-१२-८१)

# आंबेडकर भारत

लेखक बाबुराव बागुल

राजहंस प्रकाशन, पुणे. मूल्य : वीस रुपये

फिनिक्स निवड

## A Life In Our Times

Memoirs By John Kenneth Galbraith (Andre Deutsch, Pages : 563 : 47-50 about Rs. 130/–)

श्री नानी पालखीवालांचा टॅक्सविषयक सल्ला व श्री. दांडेकरांची अर्थशास्त्रावरची मते पुष्कळ लोक आपल्या देशात आदराने ऐकतात. म्हणजे सरकारेतर लोक !

तसेच गॅलब्रेथ यांचा आवाज सर्व जगात आदराने ऐकला जातो.

एके काळी गॅलब्रेथ हे 'फॉर्च्युन' मासिकाचे संपादक होते.

अनेक महत्त्वाच्या घटना आणि महान व्यक्तींचे सान्निध्य त्यांना लाभले होते. तसे सान्निध्य पुष्कळ लोकांना मिळते; परंतु त्या सान्निध्याबरोबर गॅलब्रेथना उत्कृष्ट लिहिण्याची कला अवगत आहे. त्यामुळे त्यांची पुस्तके वाचण्याचा आनंद हा एक आगळाच अनुभव आहे.

हर्मन गॉरिंग, जॉचिम व्हॉन, रिबेन्ट्रॉप, व अल्बर्ट सीअर यांच्याही त्यांनी मुलाखती घेतल्या होत्या व युद्धाचा जर्मन आर्थिक स्थितीवर काय परिणाम झाला याचे मूल्यमापन केले होते.

व्हिएटनाम युद्धाविरुद्ध त्यांनी एक लांबच लांब लढा दिला होता, हेही बहुतेकांना माहीत आहेच.

श्री. जॉन केनेडी व एडलाय स्टिव्हन्सन यांच्यासाठी निवडणुकीत त्यांनी भरपूर प्रचार केला होता.

गॅलब्रेथच्या काहीं आठवणी फारच खुमासदार आहेत. नशिबाने ताडासारख्या उंच गॅलब्रेथकडे एक पिग्मी–टाइप बाई पाठवली. अगदी तल्लख, नो–नॉनसेन्स बाई ! ती गॅलब्रेथचा जेवणाचा व इतर कार्यक्रम अगदी चोख बजाऊ लागली. एमिली ग्लॉरिया विल्सन हे तिचं नाव. तिने त्यांच्याकडे चाळीस वर्षे काम केले. ती गॅलब्रेथबरोबर भारतातसुद्धा आली होती. एके दिवशी बरेचसे काम करून गॅलब्रेथ दमले होते. 'फोन–बिन आले तर मला उठवू नको बाई !' असे ते एमिलीला म्हणाले व पहुडले.

तोच लिंडन जॉन्सन यांचा फोन आला. 'मी प्रेसिडेंट बोलतोय, जरा गॅलब्रेथना फोन द्या !'

'परंतु साहेब, ते थकून जरा झोप घेत आहेत.'

'मग उठवा त्यांना. मला त्यांच्याशी बोलायचं आहे!'

'मि. प्रेसिडेंट, सर म्हणाले की, त्यांना डिस्टर्ब करायचं नाही म्हणून.'

'तरी उठवा !'

'सॉरी, मि. प्रेसिडेंट, मी तुमच्यासाठी इथं काम करीत नाही. मी गॅलब्रेथ यांच्याकडे कामाला आहे !'

थोडया वेळाने गॅलब्रेथ उठले तेव्हा एमिलीने त्यांना निरोप दिला. मिस्टर प्रेसिडेंट अगदी खुष होते. एमिलीवर ! ते म्हणाले त्या बाईंना सांगा. या इथं व्हाइट-हाउसमध्ये त्यांच्यासाठी एक खुर्ची नेहमीच रिकामी आहे.'

जरा इथं 'जक्स्टॅपोझ' करू का ? काही सभासद वर्गणी वेळेवर भरत नाहीत म्हणून थोडया नाविन्यासाठी कधीकधी आम्ही त्यांना 'May we have your autograph please ? Ou your cheque !' किंवा 'If you do not send your dues the boss will send me on a permanent vacation' असा मजकूर पाठवतो. गेल्या वर्षी एका सभासदाने तीन महिने ओव्हर ड्यू होऊनही पैसे दिले नव्हते. तेव्हा आमच्या असिस्टंटला मी 'परमनन्ट व्हेकेशन'ची लाईन धाडायला सांगितले. तिने ती धाडली. आमचं कार्ड मिळाल्यावर लगेच त्याने पैसे भरून टाकले, एवढा त्याचा असर !

वर्ष लोटले, या वर्षीही तीन महिने झाले तरी त्याने पैसे भरले नाहीत. 'मागची हिस्टरी रीपीट करा. 'पर्मनंट व्हेकेशन'चा मजकूर पाठवा', मी असिस्टंटला म्हटले. संध्याकाळी पोस्टकार्ड तयार होते; पण त्यातला मजकूर वेगळाच, मिळमिळीत होता. 'का बरं हे असं ?' मी विचारले. मागच्या वर्षी ते थोडेसे घाबरून किती लवकर भरून गेले, आपल्यासाठी कुणी असं करतं म्हणजे बाई कससंच वाटतं, म्हणून आपला साधा मजकूर लिहिला !'

आणि खरंच अजून तो पैसे द्यायला आलो नाही !

आणखीन एक खुमासदार किस्सा म्हणजे 'arrogant' चा. हार्वर्डमध्ये असताना गॅलब्रेथ अगदी प्रकाशझोतात आले होते. FBI कडे गॅलब्रेथविषयी असंख्य फाइली होत्या. त्यात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी, त्यांच्या आर्थिक स्थितीवर, वैवाहिकजीवन, त्यांचे मित्र वगैरे अनेक विषयांवर टिपणे होती. ही सर्वच टिपणे गॅलब्रेथच्या बाजूने होती. पण त्यांचे सर्व मित्र म्हणत असत, 'He has unduly well-developed view of his own intellectual eminence.'

पुढे बऱ्याच वर्षांनी म्हणजे १९६१ मध्ये भारतात येण्याच्या आधी, न्यूयॉर्क टाईम्स या पेपरने भारतात जाणाऱ्या वकिलाचा परिचय छापला. त्या दिवशी गॅलब्रेथ प्रेसिडेंट केनेडीबरोबर अल्पोपहार करीत होते. 'काय, आपला हा जो परिचय New York Times ने दिला आहे, तो कसा काय वाटतो ?'

'परिचय चांगला आहे; पण इथं त्यांनी उद्धट का म्हटलं आहे, कळत नाही.' गॅलब्रेथ उत्तरले.

'का बरं ? सर्वच तर तुम्हाला तसे म्हणतात. मग NYT नो तसे का म्हणू नये ?' JFK नी विचारले !

'अर्थशास्त्राविषयी' या पुस्तकात काय गॅलब्रेथ लिहितात ते परत परत वाचण्यासारखे आहे. 'Economics is not durable truth. It requires continuous revision and accommodation. Nearly all its error is from those who cannot change.' Take note Dandekars and Sohonis, Dr. Rath, Dr. B. S. Minhas and Dr. Vardhan of India !

एडलाइ स्टिव्हन्सन हे इल्यनिसचे १९४९–५३ सालचे गव्हर्नर. १९५२–५६ मधे ते आईकसमोर निवडणुकीत उभे राहिले होते. (अर्थात पडले होते बिचारे !) त्या वेळेला गॅलब्रेथ कधीकधी त्यांच्या बाजूने निवडणूकप्रचारात भाग घेत असत. त्यांची मोटरकेड फार कमी लोकांच्या दुतर्फा रांगांमधून जात असे. या रांगांमधून गॅलब्रेथच्या कानांवर अशी वाक्ये येत असत, 'अरे, या मोटारी

गॅलनला किती मैल देत असतील ?' 'या मोटारीतच महाशय आले आहेत बघा ! पण त्यातला स्टीव्हन्सन कोण हो ?' 'मॉडेस्टी, गॅलब्रेथ, शुअर इज अ व्हास्टली ओव्हररेटेड व्हर्च्यू.' नाही तर काय त्यांची ताडासारखी उंची आणि ताडासारखा इगो कुठे लपला असता का ?

मी नुकताच एनसायक्लोपिडीआ ब्रिटॅनिका घेतल्यामुळे त्याचा उल्लेख कुठे तरी आला की माझे डोळे सरसावतात. विल्यम बॅंटन हे ब्रिटॅनिकाचे जनक. या पुस्तकात या बापाचा व त्याच्या मानसपुत्राचा उल्लेख आहे. अर्थात गॅलब्रेथनी बॅन्टनचा ' of philanthrophic and courageously liberal fame.' असा उल्लेख केला आहे. बापडे एका स्थानिक निवडणुकीत पडले !

खऱ्याखुऱ्या विचारवंतांचं अक्षर फार वाईट असतं म्हणतात. याचा पुरावा परत एकदा गॅलब्रेथसाहेबानी दिला आहे.

गॅलब्रेथनी काही वर्षांपूर्वी ' Ambassadar's Journal' लिहिले. पुष्कळच ओव्हर डेव्हलप्ड. (एकदा गॅलब्रेथ म्हणाले होते की, underdeveloped countries have over–developed women.) पण त्या वेळेला लठ्ठपणामुळे पुस्तकातील लोभसपणा गेला नव्हता. त्यामानाने त्यांचे ' अ लाईफ इन अवर टाईम्स' स्लिम असूनही तेवढे कमनीय वाटत नाही, परंतु मध्यमवयीन व परिपक्व जरूर वाटते !

¤

'अॅम्बॅसॅडर्स जर्नल' हे पुस्तक म्हणजे अमेरिकेचे भारतातील राजदूत म्हणून असतानाच्या काळातली, गॅलब्रेथ यांनी पुढे कधी तरी प्रकाशित करण्याच्या हेतूने जाणीवपूर्वक ठेवलेली आणि उगीचच घाई केली असे वाटू नये म्हणून ही कारकीर्द संपल्यानंतर सहा वर्षांनी प्रकाशित केलेली त्यांची दैनंदिनी. गॅलब्रेथ यांच्याच म्हणण्याप्रमाणे, त्या पुस्तकात त्यांच्या कित्येक सहकाऱ्यांबद्दल कधी दयेपोटी तर कधी मुत्सद्देगिरी म्हणून त्यांनी परखडपणे लिहिलेले नाही. तसेच त्या वेळच्या कित्येक गुप्त स्वरूपाच्या गोष्टी त्यांच्या त्या पदाच्या बंधनामुळे त्यांना त्यात लिहिता आल्या नाहीत. परंतु हे पुस्तक आहे गॅलब्रेथ यांची जीवनकथा. त्यांच्या लहानपणापासून ते आजतागायत त्यांच्या आयुष्यातल्या निरनिराळ्या वेचक प्रसंगांचे, त्यांच्या आयुष्यात आलेल्या अनेक व्यक्तींचे, त्यांच्या आयुष्याच्या संधिकालात आणि एवढ्या संपन्न अनुभवांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी त्यांच्या खास बोचक, उपरोधिक आणि स्पष्ट शैलीत केलेले वर्णन. 'अॅम्बॅसॅडर्स जर्नल' हे पुस्तक भारतीय वाचकाला निश्चितच अधिक मनोरंजक वाटेल. ते साहजिक आहे. कारण त्यातल्या बहुतेक व्यक्ती आणि स्थळे ही त्याला परिचित आहेत. याउलट, या पुस्तकातल्या कित्येक व्यक्ती, घटना आणि स्थळे ही जवळजवळ बरीचशी, कधीकधी पूर्णपणेही अपरिचित. तरीही तुलनाच करायची तर पहिले पुस्तक हे जास्त मनोरंजक, तर हे पुस्तक अधिक वाचनीय, अधिक माहितीपूर्ण, अधिक उद्‌बोधक. गॅलब्रेथ ही व्यक्तीच तशी कलंदर. लब्धप्रतिष्ठ उपदेश करण्याच्या किंवा ठाशीव निष्कर्ष काढण्याच्या भानगडीत ते पडत नाहीत. ही व्यक्ती सामान्य चौकटीत न बसणारी, केवळ प्रखर बुद्धिमान एवढेच नव्हे, तर या बुद्धिमत्तेची फार तीव्रतेने जाणीव असलेली आणि आपण बुद्धिमान आहोत, हे वारंवार अट्टाहासाने प्रतिपादन करणारी, अहंमन्य, बरीचशी तिरकस, तुटक, क्वचित उद्धटही; पण स्वतःचीही चेष्टा करताना हात आखडता न घेणारी आणि लिहिण्याची शैली थेट मुद्देसूद, उगीचच शब्दांचे, भावनाचे अवडंबर नमाजवणारी, बोचरी, ज्या व्यक्तीबद्दल लिहायचे त्याला ओरबाडणारी, वेळप्रसंगी रक्त काढणारी, तरीही तोंडाला चटका बसल्यावरही एखाद्या खमंग पदार्थाची पुन्हा चव घ्यावीशी वाटते तसे पुन्हा वाचावेसे वाटणारी आणि विचार करायला लावणारीही! निरनिराळ्या विश्वविद्यालयांचे, तिथल्या प्राध्यापकाचे, तिथल्या वातावरणाचे त्यांनी केलेले वर्णन किती भेदक आहे, हे जिज्ञासूनी मुळातूनच वाचावे. या परीक्षणाच्या स्थळमर्यादेत या पुस्तकातली फारशी अवतरणे देणे केवळ अशक्य आहे. तरीही त्यांची शैली आणि त्यांचे सूक्ष्म निरीक्षण याची वानगी म्हणून काही वाक्य उद्धृत करण्याचा मोह आवरता येत नाही.

'Animal husbundry being the most anti-intellectual subject available, it attracted the largest number of students.'

'Discussion in all higher education is the vaccum which is used to fill a vaccum.'

पण हे एवढं लिहिलं तरीही गॅलब्रेथना खंत आहेच. 'हे वाचतं कोण ? त्यांच्या शब्दात सांगायचं म्हणजे– ' One of my greatest pleasures in writing has come from the thought that perhaps my work might annoy someone of comfortably pretentious position. Then comes the sad realisation that such people rarely read.'

–जे. एन. पोंडा

–अॅड. बी. आर. रानडे

---


**– नवीन दाखल झालेली पुस्तके –**

१. **जांभ्या वगडाचे डोळे**–[ कथासंग्रह ]–कुसुम अभ्यंकर

२. **शिकलेली**–[ अनुवादित कादंबरी ]–कृष्णमूर्ति पुराणिक / अनुवाद–उषा जोगळेकर

1. **Gandhi**–[ Biography ]–William Shirer

2. **The Covenant**–] Bestseller novel of South Africa ]– James A. Michener

3. **The Roswell Incident**–[ UFOs etc. ] –Chorles Berlitz

4. **Animal Days**–[ On animals ]–Desmond Morris ]

5. **Oil Sheikhs**–] Non–fiction on Petro Dollars ]

¤ Here in our new ownership flat, 60–40,
In my deck chair, with a glass of fruit juice,
And a ' Phoenix ' book with clippings,
Plus thou beside me reading [ quietly ! ],
Oh, Happiness with a ' Phoenix ' book is complete ! *

—[ with apologies to Omar Khayam ! ]

* Only if you know how to handle books tenderly !

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

रंगभूमी । सदानंद बोरसे

# वर्षाव

## अभिनेत्यांनी हरवलेला हळवेपणा

कै. पु. भा. भाव्यांच्या 'वर्षाव' या कादंबरीवर आधारित त्याच नावाचे नाटक 'अभिजात' या संस्थेने रंगभूमीवर आणले. कादंबरीचे नाट्यरूपांतर शं. ना. नवरे यांनी केले आहे. याआधी जयवंत दळवी यांच्या 'महानंदा' कादंबरीचे शं. ना. नवरे यांनीच केलेले 'गुंतता हृदय हे' हे नाट्यरूप 'अभिजात'च्या याच संघाने रंगभूमीवर गाजवले आहे.

'वर्षाव' ही कादंबरी पु. भा. भाव्यांनी सुमारे तीस वर्षांपूर्वी लिहिली. लॉ कॉलेजात जाणारा एक तरुण आणि आपल्या पतीच्या नपुंसकत्वामुळे शरीरसुखाला आचवलेली एक अठरा-वीस वर्षांची तरुणी यांच्यातील एक आगळे, अनोखे नाते दाखवणारी ही कादंबरी त्या वेळी बरीच गाजली होती. कादंबरीतील तोच काळ कायम ठेवून तेच कथासूत्र काही थोड्या फरकांनी नाटकातून मांडलेले आहे.

नागपूरमधील आपल्या वाड्याची देखभाल करण्यासाठी एक तरुण दाखल होतो. हे वाड्याचे छोटे मालक (डॉ. काशिनाथ घाणेकर). वाड्यात नुकत्याच राहण्यास आलेल्या ल. म. पेठे (भाऊ बिवलकर) या वकिलांच्या नपुंसकत्वामुळे त्यांची सुंदर पत्नी कुसुम (आशा काळे) मालकांकडे आकर्षित होते. पेठ्यांचे शेजारी भाडेकरू दाबके (कमलाकर टाकळकर) यांचाही कुसुमवर डोळा असल्याने ते कुसुम आणि छोट्या मालकांच्या संबंधांमध्ये बिब्बा घालण्याचा मनोभावे प्रयत्न करून त्यात यशस्वी होतात. छोटे मालकही कुसुमच्या या जबरी प्रेमाकडे काहीसे आकर्षित होत असले, तरी त्यात स्वत.चे आयुष्य विसरण्याइतके आंधळे नाहीत. त्यामुळे हे प्रकरण वाढत चालल्याचे लक्षात आल्यानंतर छोटे मालक वाडा सोडून मित्राकडे व नंतर नागपूर सोडून गावी वडिलांकडे राहण्यास जातात. दरम्यान कुसुम गरोदर राहते. यातही छोट्या मालकांचे नाव निष्कारणच गोवले जाते. या धक्क्याने पेठेवकील वेडे होतात. त्या भरात त्यांनी केलेल्या मारहाणीमुळे एकदा कुसुमचा गर्भपात घडतो. शेवटी पेठेवकिलांचा भाऊ त्यांना स्वतःकडे नेतो. कुसुमही आपल्या माहेरच्या माणसांकडे निघून जाते. पावसातच कुसुमची पहिली आणि अखेरची भेट झाली असल्याने पाऊस सुरू झाला की, छोट्या मालकांच्या मनात कुसुमची आठवण फेर धरून नाचू लागते.

अशी 'वर्षाव'ची कथा. कादंबरीत काही किरकोळ बदल करून (उदाहरणार्थ– कादंबरीतील कुत्रा 'काळ्या'याच्याऐवजी नाटकात 'वेडा काळोबा' असे एका मुक्या वेड्याचे पात्र घालून कादंबरीतील 'काळ्या'ची सर्व कामे त्याच्याकडून करवून घेतली आहेत.) तर मूळ कथेत असे नगण्य बदल करून आणि बऱ्यापैकी आटोपशीर नाट्यरूपांतर होऊनही कादंबरी आणि नाटक यांच्यामध्ये नाटक धुरंधर अपयशी ठरले आहे !

'वर्षाव' या नाटकाच्या अपयशात दोन गोष्टींचा फार मोठा वाटा आहे. यातील पहिली गोष्ट–नाट्यरूपांतर होताना हरवलेला हळुवारपणा, आशय आणि आविष्कार या दोन्ही दृष्टींनी कादंबरीतील 'मी' आणि कुसुमच्या प्रेमाचा हळवा हळुवारपणा आणि नजाकत नाटकात पकडता आली नाही. कादंबरीमध्ये पहिल्या नजरानजरेतून सुरू झालेले हे नाते पुढे कित्येक दिवस नजरानजरेवरच रेंगाळते. यातील कुसुमचा स्वतःच्या अतृप्त शरीरसुखाच्या पूर्ततेचा प्रयत्न बऱ्याच नंतर घडतो. त्याचेही वर्णन कादंबरीत आले आहे ते असे,–

'दिंडी करकरली. आत अंधार होता. धडपडत मी आत शिरलो, मग कशामुळे काय झाले ते मला निश्चित सांगता येत नाही. साऱ्या गोष्टी एकदमच झाल्यासारख्या वाटल्या. माझा पाय एकदम निसटला आणि माझा झोक गेला. मला सावरण्यासाठी कुणाचे तरी हात पुढे झाले. त्या हातांनी क्षण–दोन क्षण माझे हात नुसतेच धरून ठेवले आणि मग झटक्याने आपल्या दिशेने ओढून त्या हातांनीच मला घट्ट मिठी मारली. माझ्या चेहऱ्यावर चुंबनांचा वर्षाव सुरू झाला. त्या मिठीचा आणि त्या चुंबनांचा आवेग विलक्षण होता. एखाद्या रेशमी कोशात घट्ट आवळल्यासारख्या त्या मिठीत मी बांधला गेलो. माझे शरीर निश्चेष्ट होते, मला धड श्वासही घेता येत नव्हता. माझ्या वृत्ती बधीर होऊन गेल्या होत्या.'

या बेभान बधिरावस्थेतच 'मी'ने एक शब्दही न बोलता कुसुमचा हात धरून वाड्याबाहेर पडून चालत जाणे, धुंदपणे चालत राहणे, नंतर गल्लीतील काळ्या नावाच्या कुत्र्यामुळे भानावर येऊन परतणे या सर्व प्रसंगांमध्ये कोणीही एक शब्दही बोलत नाही. या संपूर्ण निःशब्दतेत दोन मनांचा जो उन्मत्त, धुंद संवाद कादंबरीत साधला होता, तो नाटकातील याच प्रसंगामध्ये पेरलेल्या 'मला तुमच्याशी खूप खूप बोलायचंय.' आणि 'मला तुम्ही हवे आहात !' अशा घासून घासून गुळगुळीत झालेल्या बटबटीत संवादांनी पार मारून टाकला. शिवाय बराच काळ उलटल्याचे उल्लेख असले, तरी ते प्रेक्षकाच्या मनात पूर्णतः ठसण्यापूर्वीच धडाधड प्रसंग घडत गेल्यामुळे नाटकात कुसुम आणि 'मी'चे कादंबरीतील नाते उभे न राहता केवळ शरीरसुखासाठी एका तरुणाला जाळ्यात ओढू पाहणारी स्त्री, असे स्वरूप कुसुमला मिळते. निदान सुरुवातीला बराच वेळ !

कादंबरीमध्ये दोघांचे नाते हे फांझ अत्तराच्या मृद्गंधी सुवासाप्रमाणे हळूहळू खुलत जाते, अधिकाधिक गहिरे होत जाते, दोघांमधील मर्यादित शरीरसंबंध हा या नात्याचा अविभाज्य घटक असला तरी तो एकमेव घटक नाही. त्याच्या बाजूने एका निरपराध स्त्रीबद्दल, तिला आयुष्यात नाहक भोगाव्या लागणाऱ्या दुःखाबद्दल सहानुभूतियुक्त प्रेम आणि स्वतःचे आयुष्य, स्वतःची संस्कारांनी, विचारांनी बनलेली तत्त्वे, सामाजिक नीतिमूल्यांची व स्वतःच्या प्रतिमेबद्दलची भीतियुक्त काळजी यांमध्ये रस्सीखेच चालू असते. तिच्याही बाजूने थोड्या-फार फरकाने हाच संघर्ष चालू असतो. कधीकधी दोघांच्या बाजूने संयमाचा कडेलोट होण्याची वेळ येऊन ठेपते, अशा वेळी महत्प्रयासाने दोघांनी

स्वतःला आवरलेलें असते. या साऱ्यांतूनच शरीराच्या माध्यमातून जन्मलेले, पण शरीरापलीकडचे मैत्रीचे, जिव्हाळ्याचे नाते दोघामध्ये साकारते. नाटकामध्ये या गोष्टीचा कुसुमने शेवटी निघताना केलेला एक नमस्कार वगळता मागमूसही आढळत नाही. नाटकाच्या सुरुवातीला कादंबरीतील सुरुवातीचा उताराच पार्श्वध्वनी म्हणून घेतला आहे.

'उन्हाळा संपला, आकाशात मेघ फिरू लागले आणि पावसाच्या पहिल्या सरी पडू लागल्या म्हणजे माझ्या मनाला कसली तरी विचित्र हुरहूर लागते...भुईवरून ढगाच्या सावल्या धावत जाव्यात तशा मनावरून आठवणी धावत जातात...ओले वारे घोंगावत असतात. आकाशात मेघ जमून येतात. भर दिवसा दिशा अधारतात व मग पाऊस कोसळू लागतो. अशा वेळी मला कुसुमची आठवण येते.' इत्यादी.

नाटकाचा शेवटही कादंबरीतील—

'कडाडणाऱ्या विजाची, गरजणाऱ्या मेघांची, घोगावणाऱ्या वाऱ्याची व कोसळणाऱ्या जलधाराची मी वाट पाहत असतो. मला वाटते, कुसुम, तुझी उरलेली अज्ञात कहाणी ही सारी मला सागणार आहेत. पावसाळ्यातच सुरू झालेल्या या कथेचा शेवट मी पावसाळ्यातच ऐकणार आहे आणि तो शेवट मी तुझ्या तोडून ऐकणार आहे, कुसुम!'

—या शेवटच्या उताऱ्याने केला आहे. (हे दोन्ही उतारे नाटकात छोटया मालकाचे म्हणून असले तरी त्यासाठी आवाज डॉ. काशिनाथ घाणेकराचा वापरलेला नाही. जर माझा अंदाज बरोबर असेल तर तो आवाज बाळ कुरतडकराचा आहे.) या झलक म्हणून दिलेल्या दोन उताऱ्यांमधून व्यक्त होणारी कुसुम व 'मी'मधील भावना नाटकापासून मात्र चार हात अतर राखूनच राहिली आहे.

कादंबरीतील प्रसंगांची मात्र अत्यत वेचक निवड करून, प्रसगी त्यात स्वतःची भरही टाकून शं. ना. नवऱ्यानी बहुतेक व्यक्तिरेखाचे बारकावे मात्र अत्यंत सुरेख उभे केले आहेत.

नाटकाच्या अपयशात वाटेकरी असलेली दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, नाटकातील अभिनेते. त्यातही ल. म. पेठेवकील झालेले भाऊ बिवलकर, दाबक्याच्या भूमिकेत कमलाकर टाकळकर, तेलंग आक्का झालेल्या मालती पेंढारकर आणि वेडा काळोबा झालेला गणा प्रधान हे चौघेजण भडकपणा वगळता आपल्या भूमिका सुरेख करतात; पण कुसुम आणि मालक या दोन व्यक्तिरेखा—त्याही प्रमुख व्यक्तिरेखाच—नाटक खाली आणण्याचे काम स्वतः होऊन निष्ठेने आणि हौसेने करतात. कुसुमच्या दिसण्याबद्दल कादंबरीकाराने केलेले वर्णन असे,—'खाबाला टेकून एक अतिशय तरतरीत बाई चित्रासारखी उभी होती. तिचा चेहरा गोल होता. डोळे टपोरे आणि काळेशार होते. वर्ण गव्हाळा होता. तिने केसाचा किंचित तिरपा भाग काढला होता व तिच्या मानेवर भला मोठा अंबाडा लोळत होता. ती बाई सडसडीत असण्यापेक्षा गुबगुबीत होती....तिचे वय अठरा ते वीस इतकेच असेल...ही मुलगी पुढे कदाचित स्थूल झाली; पण आज मात्र ती निकोप प्रकृतीने नुसती रसरसल्यासारखी दिसत होती.' आशाबाईंच्या चेहऱ्याबद्दल हे वर्णन ठीक आहे. बाकी मात्र त्यात थोडा बदल करावा लागतो, 'आशाबाई पूर्वी कदाचित निकोप प्रकृतीने नुसत्या रसरसल्यादिसत असतील; पण आज मात्र त्या नुसत्याच स्थूल आहेत.' त्यामुळे त्याना अठरा—वीस वर्षांची मुलगी म्हणून स्वीकारणे जरा जडच. मालकाशिवाय अन्य पात्रांबरोबरचे आशाबाईंचे चांगले काम झाले. आपला पुरुषीपणा नव्हे तर नवरेपणा प्रस्थापित करण्यासाठी अंगचटीला येणाऱ्या पेठेवकिलाचा स्पर्श चुकविण्यासाठीचे कुसुमचे आक्रसलेपण, तेलंगअक्काजवळ भडाभडा स्वतःचे दु:ख ओकणारे हळवेपण, आपल्यावर वाईट नजर ठेवणाऱ्या दाबक्यांविषयीची चीड इत्यादी त्यानी सुदर सादर केले; पण नेमके. छोटया मालकाबरोबर असलेले प्रसंग एक—दोन अपवाद वगळता अत्यंत कृत्रिम झाले. त्या वेळी त्याच्या तोडून बाहेर पडणारे सवाद (शब्द व पद्धती दोन्ही दृष्टीनी) 'दूर्वांची जुडी'ची आठवण करून देत होते. त्याना फीट येण्याचा प्रकार म्हणजे तर नाटकातील नको त्या वेळी केलेला विनोदच होता. छोटे मालक डॉ. काशिनाथ घाणेकरानी सादर केले. त्याच्या अत्यंत अस्ताव्यस्त आणि अतिरेकी हालचाली, चेहऱ्यातील सर्व स्नायूना पवनचक्क्या जोडल्याप्रमाणे त्याची होणारी गरगर, घसा खरवडून केलेला आरडाओरडा, या वरच्या पट्टीत व अत्यत घाणेरड्या शब्दोच्चारात ऐतिहासिक नाटकी पद्धतीने केलेली सवादफेक आणि या साऱ्याच्या जोडीला मधून मधून पाठातर विसरणे असा सगळाच दोषसमुच्चय एकाच ठिकाणी एकवटल्यामुळे त्याच्याबद्दल काही लिहायचे म्हटले तर फक्त फुल्याच छापाव्या लागतील. 'तुला असं का वाटतं कुसुम?' यासारखी साधी, सरळ, सोपी वाक्येही घाणेकर ओठांचा डावा कोपरा डाव्या डोळ्यापर्यंत वर उचलून शक्य तितक्या भसाड्या आवाजात आरडाओरडा करीत 'थुलें ॲस ऽऽ खॅ वॅट्तं, ऽऽऽ, खुसू ऽऽऽम?' या शब्दामध्ये विचारणार आणि हे सगळे सबंध नाटकभर चालू राहणार त्यामुळे त्यांची एंट्री आली की, 'बालगंधर्व'चा परिसर सोडून पळून जावेसे वाटत होते! नाटकात हरवलेल्या किंवा मारल्या गेलेल्या कोवळिकीचे घाणेकर हे प्रमुख मारेकरी होते.

नाटकाचे दिग्दर्शक आहेत नंदकुमार रावते. नाटकाचे एकूणच संपूर्ण वेळ दिसणारे अतिनाटयमय रूप सोडल्यास अभिनेत्याकडून रावत्यांनी उत्तम कामे करून घेतली आहेत, पात्रांची निवडही उत्तम. उदाहरणार्थ— 'पेठे एखाद्या गरीबशा मेंढ्यासारखा दिसे, तर दाबकेचे एकूण अवसान एखाद्या एडक्याचे होते.' या वाक्याची सार्थता पटविणारे नाटकातील पेठे आणि दाबके. या सगळ्याला एकमेव अपवाद अर्थातच नाटकातील स्टार—डॉ. काशिनाथ घाणेकर! नाटकात अभिप्रेत असलेल्या तरुण, देखण्या व उमद्या छोटया मालकाच्या जागी घाणेकराचे वेडावाकडा चेहरा करून वावरणारे पन्नाशीचे जाडेभरडे, निबर देखणेपण पाहणे आणि शिवाय त्याचे वाईट कामही सहन करणे हा प्रेक्षकावरील जुलूम रावत्याना टाळता आला असता. नाटकात रंगभूषा, वेशभूषा, नेपथ्य या सगळ्याच्याद्वारे नाटकातील एकोणीसशे पन्नासच्या आसपासचे वातावरण ठेवलेले असताना मधूनच एकोणीसशे ऐंशी सालातील दोनशे अठ्ठेचाळीस ज्वलनबिंदूवाली 'The Ship' काड्यापेटी दाखवण्यासारख्या बारीक-सारीक चुका मधूनमधून टोचत होत्या.

नाटकाचे नेपथ्य आणि प्रकाशयोजना बाबा पार्सेकराची होती. फिरत्या रगमचाच्या आधारे तीन वेगवेगळ्या स्थळाचे उभे केलेले आणि अनुरूप सजवलेले नेपथ्य आणि शेवटी पाऊस-सरीचा आभास निर्माण करणारी प्रकाशयोजना अशा गोष्टींमधून त्याची हातोटी आणि सराईत कुशलता दिसून आली!

नाटकाला संगीत अरविंद मयेकरांचे होते. कुसुमच्या प्रवेशाच्या वेळी वाजणारे नाजूक सतुर आणि बासरी, तिचा एकटेपणा जिवत करणारे हार्मोनियचे सूर, अगदी फिरता रंगमंच फिरून दृश्य बदलेपर्यंतच्या मोकळ्या जागा भरून काढणारे गोड सूर या सगळ्यानी नाटकाचा बराच भाग श्रवणीय बनवला.

## प्राध्यापकांच्या बहिष्काराला विद्यार्थ्यांचा विरोध कशासाठी ?

मुखपृष्ठावरून

थोडक्यात म्हणजे परीक्षा वेळेवर व्हाव्यात व परिणामी नंतर उद्‌भवणाऱ्या दुष्टचक्रातून आपली सुटका व्हावी अशी विद्यार्थ्यांची भूमिका आहे व गेली काही वर्षे परीक्षा-बहिष्काराचे परिणाम भोगलेला विद्यार्थीवर्ग, प्राध्यापक, विद्यापीठ व सरकार यांच्याविरुद्ध आज दंड थोपटून उभा आहे ! विद्यार्थी परिषदेने 'परीक्षा बचाओ' आंदोलन सुरू केले ते याचसाठी !

विद्यार्थ्यांच्या या भूमिकेला समाजातील सर्व स्तरांतून वाढता पाठिंबा आहे. विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक, पत्रकार इत्यादी अनेकांनी प्राध्यापकांच्या मागण्यांबद्दल सहानुभूती दर्शवीत असतानाच 'बहिष्कार' पवित्र्याला विरोध केला आहे. अर्थात प्राध्यापक संघटनांचे पदाधिकारी व प्रा. स. शि. भावे यांच्यासारखी मंडळी मात्र प्राध्यापकाचेच समर्थन करीत आहेत. (माणूस, दि. ६ फेब्रुवारी) या मंडळीचे मुद्देही सर्वसाधारण सारखे आहेत. यांपैकी अनेकजण 'प्राध्यापक-विद्यार्थी एकते'ची घोषणा देऊन विद्यार्थ्यांनीही या आंदोलनाला पाठिंबा द्यावा, निदान बहिष्काराला विरोध करू नये अशा मताचे आहेत; परंतु दुर्दैवाने विद्यार्थ्यांना, त्यांच्या संघटनांना वा निर्वाचित प्रतिनिधींना विश्वासात घेण्यास मात्र त्यांची तयारी नाही. विद्यार्थ्यांच्या मताची पर्वा न करता त्यांना गृहीत धरणाऱ्या या प्राध्यापक संघटनांनी 'बहिष्कार-निर्णय' जाहीर करण्यापूर्वी किती संघटनांनी बातचीत केली ? संघटनांचे राहू द्या; पण किती निर्वाचित प्रतिनिधींशी बोलणी केली ? मुंबईत प्राध्यापकांशी संवाद साधण्याचा पहिला प्रयत्न अ. भा. वि. प.ने केला, BUCTU (बक्टू)ने नव्हे ! 'प्राध्यापक-विद्यार्थी एकते'चा नारा देणारी मंडळी हे सोयिस्करपणे विसरली, यातून विद्यार्थ्यांना गृहीत धरण्याची वा त्यांना किंमत न देण्याची बेपर्वाईच दिसत नाही काय ?

प्राध्यापक सघटनेची मंडळी असंही सांगतात की, आमच्या मागण्या दीर्घकाळ रेंगाळत आहेत व त्या मान्य करून घ्यायच्या असतील तर बहिष्काराशिवाय तरणोपाय नाही ! प्राध्यापकाचा हा दावा म्हणजे निव्वळ रंगसफेदी आहे ! मुळात विद्यार्थ्यांनाही प्राध्यापकांच्या मागण्यांबद्दल सहानुभूती आहेच; त्यांचे म्हणणे एवढेच की, आपल्या मागण्या हा प्राध्यापकांचा एवढा जीवन-मरणाचा प्रश्न नाही की त्यांनी त्यासाठी लाखो विद्यार्थ्यांना बेमुर्वतखोरपणे वेठीस धरावे. प्राध्यापकांचे वेतनविषयक अनेक प्रश्न दीर्घकाळ रेंगाळत असले तरी इतर अनेक बाबतीत समाजातील अनेक अन्य घटकांपेक्षा प्राध्यापकवर्ग हा Previleged Class वाटावा इतका सुस्थितीत आहे, ही वस्तुस्थिती आहे. असे असले तरी आपले जीवनमान उंचावण्याचा त्यांना रास्त अधिकार आहे व यामुळे त्यांच्या बहुसंख्य मागण्या या न्याय्यच ठरतात. प्रश्न आहे तो त्यासाठी बहिष्काराचे शस्त्र वापरण्याचा !

विद्यार्थी परिषदेसह अनेकांनी प्राध्यापक संघटनेस जाहीरपणे सुचवले आहे की, प्राध्यापकांनी परीक्षा-बहिष्कार टाळून जूनमध्ये संपावर जावे, त्या वेळी विद्यार्थी त्यांच्या खांद्याला खांदा देऊन लढतील ! यावर प्राध्यापक सांगतात की, जूनमध्ये संप करून काहीही होणार नाही, उलट आताच विद्यार्थ्यांचे नाक दाबले तर शासनाचे तोंड उघडेल ! पण खरे म्हणजे हेही एक गृहीतच आहे. जूनमध्ये बेमुदत संपावर जाण्याचा प्रयोग प्राध्यापकांनी याआधी कधी केलाय ? (परवा मुंबईत एका सभेत 'बुक्टू'चे सरचिटणीस प्रा. ठेकेदत्त यांनी सांगितले की, मागच्या वर्षी मुंबई विद्यापीठात प्राध्यापकांनी सह-शैक्षणिक उपक्रमावर (Co-curricular activities) बहिष्कार टाकला होता; पण पुढे यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव मिळत नाही, हे पाहून प्राध्यापक कष्टी झाले व त्यांनी बहिष्कार मागे घेतला ! विद्यार्थ्यांच्या गुणांच्या विकासाला वाव मिळत नाही म्हणून 'कष्टी' होणारे हेच प्राध्यापक लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात ढकलण्यास मात्र उत्सुक आहेत !)

जून-जुलैत शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी संपावर जाण्याचा प्रयोग प्राध्यापक करीत नाहीत, याचे कारण असा प्रयोग त्यांना परवडणारा नाही ! असा संप त्यांनी केलाच तर त्यांचा पगार कापला जाईल व आज केवळ कमाविण्यासाठी संघर्षसिद्ध झालेल्या प्राध्यापकांवर आपला पगार गमविण्याची पाळी येईल व नेमके तेच त्यांना नको आहे ! गिरणी-कामगार, पालिका-कर्मचारी वा अन्य कोणीही संपावर जातात तेव्हा ते आपला पगार गमविण्याची


## साप्ताहिक माणूस

( मालकी व तत्संबंधित इतर तपशिलाचे निवेदन )
( अधिनियम ४, नियम ८ अन्वये )

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशनस्थळ | : | पुणे |
| २. प्रकाशन-काळ | : | साप्ताहिक |
| ३. मुद्रक, प्रकाशक, संपादक | : | श्री. ग. माजगावकर |
| नाव व पत्ता | : | १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० |
| ४. नागरिकत्व- | : | भारतीय |
| ५. प्रकाशनसंस्थेचे नाव | : | राजहंस प्रकाशन |
| व तिच्या मालकांचे नाव | : | श्री. ग. माजगावकर |
| व पत्ता | : | १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० |

वर दिलेला तपशील बरोबर आहे.

प्रकाशकाची सही.
दिनांक ६ मार्च १९८२ श्री. ग. माजगावकर

तयारी ठेवतात; पण प्राध्यापक अधिक हुशार आहेत ! एकीकडे मागण्यांबद्दल सहानुभूती मिळवत ते बहिष्काराचे शस्त्र उपसतात तेव्हा स्वत:च्या शर्टाची इस्त्रीही न बिघडू देता ते आपले खिसे भरण्याची अभिलाषा बाळगतात ! कामगार आपल्या संपाच्या लढ्यात स्वतः त्याग करतो, प्राध्यापक मात्र लाखो विद्यार्थ्यांच्या मानसिक ताणाच्या होळीवर स्वतःची पोळी भाजायला निघाले आहेत! बहिष्कार यशस्वी झाला तर प्राध्यापक बरेच काही मिळवतील; अयशस्वी झाला तरी त्यांचे काहीही जाणार नाही. उलट बहिष्कार यशस्वी होवो वा अयशस्वी, बेफिकीर शासन, चलाख प्राध्यापक व निष्क्रिय विद्यापीठे यांच्या तावडीत सापडलेला विद्यार्थी मात्र नेहमीच काही ना काही गमावणार आहे ! तेही स्वतःचा काडीइतकाही दोष नसताना.

दुर्दैवाने, कामगारक्षेत्रातील क्लृप्त्या शिक्षणक्षेत्रात आणणारे प्राध्यापक कामगारांप्रमाणे रस्त्यावर येण्यासही तयार नाहीत. तसे नसते तर गेल्या दि ४ फेब्रुवारीला मुबईत निघालेल्या प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याच्या मोर्चात निदान दोनशे तरी प्राध्यापक दिसले असते ! समजा, प्राध्यापक संघटनेच्या दाव्यानुसार या मोर्चात प्राध्यापक बहुसंख्य होते असे मानले तर कुलगुरू राम जोशींची व्यक्तिगत निंदानालस्ती करणाऱ्या, त्यांना शिवीगाळ करणाऱ्या सहाव्या दर्जाच्या भाषेतील घोषणा त्यानीच दिल्या होत्या, असे मानायचे काय ?

तात्पर्य, बहिष्कारांचे अंतिम शस्त्र कोणताही उपाय न उरल्याने आपण उचलत आहोत, हा प्राध्यापकांचा दावा म्हणजे शुद्ध फसवणूक आहे. अशा भूलथापा देऊन प्राध्यापक उरलीसुरली सहानुभूतीही गमावीत आहेत. खरे म्हणजे अ. भा. विद्यार्थी परिषदेलासुद्धा प्राध्यापकांच्या मागण्यांबाबत प्रामाणिक सहानुभूती आहे; पण मुळात विद्यार्थ्यांना विश्वासात न घेता, हजारो विद्यार्थ्यांच्या अडचणीची पर्वा न करता प्राध्यापक संघटनेने हे टोकाचे पाऊल उचलले आहे व गुरु-शिष्यांच्या एकतेला त्यांनीच खीळ घातली आहे. इतके दिवस शांतपणे सहन करणारा विद्यार्थी आता जागा झाला आहे. प्राध्यापकांबरोबरच या पेचप्रसंगाला जबाबदार असलेल्या विद्यापीठ व शासकीय अधिकाऱ्यांवरही त्याचा राग आहे. विद्यार्थी परिषदेनंतर पूर्वीपासून शैक्षणिक परिवाराच्या संकल्पनेतून प्राध्यापकांचा सक्रीय सहभाग आपल्या कामात वाढविला आहे, तेव्हा शासनाविरुद्ध योग्य प्रकारे विद्यार्थी आपला निषेध नोदवतीलच. शासकीय पातळीवर शिक्षणक्षेत्राची जी दारुण उपेक्षा केली जाते त्याचेच हे परिणाम आहेत व विद्यार्थी परिषदेसारख्या संघटना त्याविरुद्ध निरंतर लढत आहेत, पुढेही लढतील !

पण तेवढे पुरेसे नाही ! विद्यार्थ्यांच्या मताची कदर करून, त्यांना विश्वासात घेऊन, शक्यतो त्यांच्या पाठिंब्यासह प्राध्यापकांनी रणशिंग फुंकले असते तर ते अधिक प्रभावी ठरले असते व आताचे कटुतेचे वातावरणही निर्माण झाले नसते. थोडक्यात म्हणजे, परीक्षांवरील बहिष्कारासारखा टोकाचा, आततायी व अविचारी निर्णय घेऊन प्राध्यापकांनी शैक्षणिक परिवारात अकारण दुफळी निर्माण केली आहे, विद्यार्थ्यांच्या व सामान्य जनतेच्या असंतोषास आता त्यांनाच तोंड द्यावे लागेल ! प्रा. स. शि. भावे व प्राध्यापक संघटनेची मंडळी नाण्याची ही बाजूही विचारात घेतील का ?

— विनय सहस्रबुद्धे


**अभ्यासकास उपयुक्त**
**शेतकऱ्यास प्रेरक**

"श्री. विजय परुळकर यांनी शेतकरी आंदोलनाचे, शरद जोशी यांच्या नेतृत्वाचे व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष संघर्षाचे चित्र अतिशय जिव्हाळ्याने व ज़वळिकीने शब्दबद्ध केले आहे. त्यांच्या निवेदनाच्या सहजशैलीमुळे 'योद्धा शेतकरी' हे पुस्तक वाचनीय झाले आहे. शेतकऱ्यांच्या चळवळीतील एका नव्या पर्वाचे हे शब्दचित्र शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यास प्रेरणा देईल व शेतकरी आंदोलनाच्या अभ्यासकास अतिशय उपयुक्त ठरेल. वार्ताहराच्या तडफेने, अभ्यासकाच्या तिडिकीने व शेतकऱ्यांबद्दलच्या तळमळीने लिहिलेले हे पुस्तक शेतकरी चळवळीच्या वाङ्मयात भर टाकणारे आहे."

—प्रा. एम्. डी. देशपांडे
रविवार सकाळ (कोल्हापूर)
दि. २४ जानेवारी १९८२

# योद्धा शेतकरी

**ले. : विजय परुळकर**
राजहंस प्रकाशन, पुणे ३०
किंमत : रुपये छत्तीस
नेत्यांची व आंदोलनाची छायाचित्रे
पचरंगी मुखपृष्ठ

**MANOOS** (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage-No. 11)

